अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ६ / २००७.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : २९ -१० -२००७.

अहमदनगर महानगरपालिकेच्या खास सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ह) अन्वये.)
सभा सुचना क्रमांक ७ , दिनांक ३- ११- २००७.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती..............................................................

सदस्य / सदस्या, प्रभाग क्रमांक
अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ह) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा शनिवार दिनांक ३-११-२००७ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १.विषय पत्रिका
२.प्रस्तावाची टिप्पणी.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सभा क्रमांक ७ दिनांक ३ - ११- २००७ रोजी दु.१.०० वां होणा-या मा.खास सभेची विषय पत्रिका.

**-- *--**

| विषय क्रमांक | विषय |
|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या व सध्या माजी सैनिक संघा मार्फत चालविल्या जाणा-या सिध्दीबागेतील जलतरण तलावामध्ये दि.२९-९-२००७ रोजी पाण्यात बुडून कु.फरमानखान पठाण या अल्पवयीन मुलाचा झालेल्या मृत्यु प्रकरणाचा अहवाल सभेपुढे निर्णयार्थ सादर. |
| २ | अहमदनगर महानगरपालिका कर्मचा-यांना ( मेडिकल ) वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना लागु करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ. |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेतील कर्मचा-यांना सन २००६-०७ या आर्थिक वर्षात सानुग्रह अनुदान देणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ . |
| ४ | विकास योजना ( वाढीव क्षेत्र ) अहमदनगर दिनांक १-१०-२००७ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकतींची सुनावणी घेण्यांसाठी नियोजन समितीस निर्देश देणेबाबत मा.नगरसेवक श्री.शेख अरिफ रफिउद्यीन ,मा.श्री.सतिष बबनराव मैड,मा.सौ.संध्या बाळासाहेब पवार यांची दिनांक १०-१०-२००७ तसेच श्री.सुभाष लोंढे सभापती स्थायी समिती यांची दि.२०-१०-२००७ रोजीची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ. |
| ५ | अहमदनगर शहरात बसविण्यात येत असलेल्या हायमास्ट दिव्याकरीता वस्तुस्थितीचे अवलोकन व अंतिम निर्णयास्तव महासभेपुढे मंजुरीस्तव सादर. |
| ६ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : २९-१०-२००७.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**इ ति वृ त्त :** **दिनांक : १३-९-२००६.**

**.....................................................................................................**

**दिनांक २१-७-२००७ रोजी घेण्यांत आलेल्या सभा क्रमांक ४ च्या खास सभेचे इतिवृत्त.**

अहमदनगर महानगरपालिकेची महासभा क्रमांक ४ ची सर्वसाधारण सभा ..... दिनांक २१-७-२००७ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत **मा.महापौर श्री.संदिप भानुदास कोतकर** हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्माननीय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

**मा.महापौर : श्री.संदिप भानुदास कोतकर**

**मा.उपमहापौर : श्री दिपक वसंतराव सुळ**

| अ.नं. | मा.सदस्यांचे नांव | अ.नं. | मा.सदस्यांचे नांव |
|---|---|---|---|
| 1 | कोतकर संदिप भानुदास<br>महापौर | 23 | राहिंज कमलबाई बापूसाहेब |
| 2 | सुळ दिपक वसंतराव<br>उपमहापौर | 24 | कोतकर सुनिल रामदास |
| 3 | लोढे सुभाष सोपानराव<br>सभापती,स्थायी समिती | 25 | खैरे दिपक साहेबराव |
| 4 | डागवाले किशोर आसाराम<br>सभागृह नेता | 26 | लोंढे सोमनाथ सोपानराव. |
| 5 | सत्रे योगिता रंजीत<br>सभापती,म.बा.क.समिती | 27 | दातरंगे अर्जुन भाऊसाहेब |
| 6 | गंगेकर अंजना राजू<br>उपसभापती म.बा.क.समिती | 28 | वाकळे बहिरनाथ तुकाराम |
| 7 | कानडे अशोक नाथा | 29 | शिंदे दशरथ बाबु |
| 8 | मोरे सविता दिलीप | 30 | चव्हाण दिप नारायण |
| 9 | बारस्कर पोपट जगन्नाथ | 31 | तिवारी सुरेश रतनप्रसाद |
| 10 | पाऊलबुध्दे विनीत नाथ | 32 | दहिफळे कविता अशोक |
| 11 | पवार संध्या बाळासाहेब | 33 | सकट पवित्रा भाउ |
| 12 | दिघे विमल रामचंद्र | 34 | शेख अरिफ शेख रफिउद्यीन |
| 13 | शेख मुदस्सर अहमद इसहाक | 35 | शेख सुरय्या लियाकत |
| 14 | उडानशिवे भाऊसाहेब भिमाजी | 36 | कुरेशी मुश्ताक इब्राहिम |
| 15 | सय्यद वर्षा अरीफ | 37 | कावरे आसाराम हरिभाऊ |
| 16 | भागानगरे मनिषा प्रकाश | 38 | बिज्जा अर्चना संतोष |
| 17 | जगताप नितीन विलास | 39 | जाधव कृष्णा दत्तात्रय |
| 18 | शिंदे कांताबाई अरुण | 40 | गुंदेचा मंगला सतिष |
| 19 | फुलसौंदर भगवान प्रल्हाद | 41 | |
| 20 | कांबळे मंगला राजकुमार | 42 | |
| 21 | लोंढे संजयकुमार पांडुरंग | 43 | |
| 22 | गव्हाळे विजय नाना | 44 | |

**नामनिर्देशित सदस्य**

१.घुले शंकरराव हरिभाउ २. गिरवले कैलास रामभाउ ३. गारूडकर अंबादास बबन

**तर**

१. पवार नामदेव शांताराम २.गंधे मिलिंद सदाशिव ३.खान समद वहाब ४.साहनी सुनिता राकेश ५.सय्यद सादिक अरिफ ६. साठे मनेश दशरथ ७.त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण ८. कोतकर भानुदास एकनाथ ९. काळे गितांजली सुनिल १०.आगरकर अभय जगन्नाथ ११. शेंडगे रोहिणी संजय १२.बोरूडे अनिल वसंतराव १३.जोशी अनंत सुर्यकांत १४. गुरूड राधा रमेश १५.मैड सतिष बबनराव १६. खांडरे ज्ञानेश्वर सदाशिव १७. शेख अहमद अब्दुल रज्जाक उर्फ नज्जु पहिलवान १८. घुले अविनाश हरिभाउ १९. खरपुडे जयश्री सुरेश २०.कुलकर्णी नरेंद्र सच्चिदानंद २१.बोरूडे इंदुबाई परशुराम २२. शेळके सुरेश छबुराव २३.मुदगल सुनिता दत्तात्रय २४.चोपडा संजय फुलचंद २५.बोरा किशोरकुमार हिंम्मतलाल २६.शिंदे अनिल माधवराव २७.राठोड राजेंद्र रामनारायण.

**हे सन्माननीय सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.**

**विषय क्रमांक :**

प्रेषक : सहाय्यक आयुक्त
प्रति : मा.नगरसचिव,

**प्रस्तावना :**

**विषय :** सन २००६-२००७ या वर्षासाठी महानगरपालिका कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत...

**टिप्पणी :** विनंती रिपोर्ट सादर की, सन २००६-२००७ या आर्थिक वर्षासाठी अहमदनगर महानगरपालिकेतील कायम कर्मचारी यांना बोनस / सानुग्रह अनुदान देणेबाबत मा.महासभेने ठराव क्रमांक ३ दिनांक ०३/११/२००७ अन्वये सर्व कायम कर्मचा-यांना रु.२,०००/- (रुपये दोन हजार मात्र) सानुग्रह अनुदान देण्यांस मान्यता दिली.तद्नंतर सर्व महानगरपालिका कर्मचारी यांनी काम बंद,धरणे आंदोलन केले.सणासुदीचे दिवस व आरोग्यच्या दृष्टीने मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब व इतर पदाधिकारी यांचेत संयुक्त बैठक होवून सन २००६-२००७ या आर्थिक वर्षासाठी अहमदनगर महानगरपालिकेतील पात्र कायम कर्मचा-यांना (प्रोबेशनरीसह) प्रत्येकी रु. ७,०००/- (रुपये सात हजार मात्र) सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झाला असून त्याप्रमाणे महानगरपालिका कामगार युनियन यांचेशी करार झालेला आहे.

तरी सदर करार व चर्चेप्रमाणे सन २००६-२००७ या आर्थीक वर्षात अहमदनगर महानगरपालिकेतील पात्र कायम कर्मचा-यांना (प्रोबेशनरीसह) प्रत्येकी रु. ७,०००/- (रुपये सात हजार मात्र) देणेबाबत तसेच सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी मा.महासभेकडे पाठविणेस आदेशार्थ सादर.

(आर.ए.देशमुख)
सहाय्यक आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : ३-११-२००७.

---

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या व सध्या माजी सैनिक संघामार्फत चालविल्या जाणा-या सिध्दीबागेतील जलतरण तलावा मध्ये दि.२९/९/२००७ रोजी पाण्यात बुडून कु.फरमानखान पठाण,या अल्पवयीन मुलाचा झालेल्या मृत्यू प्रकरणाचा अहवाल सभेपुढे निर्णयार्थ सादर.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : वरील विषय व संदर्भीय अहवालानुसार सादर करण्यात येते की, दिनांक २९/९/२००७ रोजी अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचा व सध्या माजी सैनिक संघ यांच्या व्यवस्थापनाखाली चालविल्या जाणा-या सिध्दीबाग येथील जलतरण तलावात कु. फरमानखान पठाण, या अल्पवयीन मुलाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झालेला आहे.

या अनुषंगाने सा.प्र.वि. जा.क्र. २१८० दिनांक ३०/९/२००७ रोजी महानगरपालिकेमार्फत चौकशीकामी त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आलेली होती. या समितीने जलविहारातील सर्व परिस्थितीची पहाणी करून त्याचा अहवाल दिनांक ३/१०/२००७ रोजी दिलेला आहे. [सदर अहवाल सोबत जोडलेला आहे.]

या अहवालातील "उपरोक्त परिस्थिती पाहता माजी सैनिक संघ , व्यवस्थापन जलविहार यांनी घटनेच्या वेळेस किमान तिकीट विक्रेता सोडून इतर चार [४] जीवरक्षक ठेवणे जरूरीचे होते. तसेच त्यांनी लाइट जॅकेटचा पुरेपुर वापर करणेही गरजेचे होते. तसेच साडेतीन ते पाच फुट पाणी पातळीच्या दरम्यान संरक्षण जाळी ठेवणे गरजेचे होते. याप्रमाणे दक्षता न घेतल्यामुळे जिल्हा माजी सैनिक संघाने दि. ९/५/२००५ रोजीच्या प्रतिज्ञापत्रातील अटींचे व शर्तीचे उल्लंघन झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सकृत दर्शनी माजी सैनिक संघाचे व्यवस्थापन दोषी आढळून येत आहे." याप्रमाणे नमूद केलेले आहे.

अहवालाचे अवलोकन करता , माजी सैनिक संघ यांनी मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ७ दिनांक २९/११/२००४ अन्वये घालून दिलेल्या अटी व शर्तीनुसार करून दिलेला करारनामा व दिनांक ९/५/२००५ जलविहारातील करावयाच्या सुधारणा याचे प्रतिज्ञापत्र यांचे उल्लंघन केलेले आहे. दिनांक ९/५/२००५चे प्रतिज्ञापत्रानुसार दिनांक २९/९/२००७ रोजीच्या घटनेच्या दिवशी जलविहार येथे किमान चार [४] जीवरक्षक ठेवण्यास हवे असताना प्रत्यक्षात मात्र तिकीट विक्रेता धरून तीन [३] कर्मचारी ठेवलेले होते. तसेच ३.५ फुट पाणी असणा-या विभागात जाळी नव्हती. तसेच पोहता न येणा-या व्यक्तींबरोबर त्यांचे पालक असणे गरजेचे असताना कु.फरमानखान पठाण यास विनापालक आत सोडण्यात आले.येणेप्रमाणे कराराचे व प्रतिज्ञापत्राचे पालन केलेले आढळून न आल्याने माजी सैनिक संघ व्यवस्थापन यांचेवर कारवाई होणे जरूरीचे वाटते.

तथापि पुढील योग्य त्या आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, उपरोक्त अहवालाचे अवलोकन केले असता 'अ' 'ब' 'क' 'ड' पाहता माजी सैनिक संघ व्यवस्थापनाने महानगरपालिके बरोबर केलेल्या करारनाम्याचे उल्लंघन केल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते.

खालील नमुद अटीशर्तीचा भंग केल्याचे दिसते.

१. तिकिट विक्रेता सोडुन चार (४) जिवन रक्षक ठेवणे बंधनकारक असतांना ते ठेवल्याचे दिसुन येत नाही.

२. पुरेसे लाईफ जॅकेट ठेवणे बंधनकारक असतांना ते ठेवल्याचे दिसुन येत नाही.

३. साडेतीन ते पाच फुट पाणी पातळीच्या ठिकाणी संरक्षण जाळी असणे बंधनकारक असतांना ती नसल्याचे दिसुन येते.

४. तसेच पोहता न येणा-या व्यक्ती सोबत त्यांचे पालक असणे बंधनकारक असतांना ते सोबत नसल्याचे दिसुन येते.

वरील नमुद अटी व शर्तीचा संबंधितांनी भंग केला असल्याने सदर माजी सैनिक संघ यांना चालविणेस देणेंत आलेला तरणतलावाचा ठेका मा.महासभेच्या मंजुरीने रद्य करून पुन्हा जाहिर निविदा देवुन दुस-या एजन्सीला ठेका देणे अथवा तरण तलावाचा लिलाव करून त्याचे खाजगीकरण करणे योग्य राहील असे मत आहे. करीता मर्जीनुरूप आदेशार्थ व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, निर्णयाकरीता सदर विषय महासभेसमोर ठेवावा.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, नगरसचिव विषय महासभेमध्ये घेण्यात यावा.

अशाबाबतचा अहवाल मा.उपायुक्त (सा) , मा.आयुक्त साहेब,मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

१) मा.श्री.दीप चव्हाण - अहवाल वाचन करण्यात यावे. त्यानुसार अहवाल वाचन करण्यात आले.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - जलविहार संदर्भामध्ये रिपोर्ट वाचल्याप्रमाणे दोन वर्षामध्ये तीन मुलांचा दुर्देवी मृत्यु झालेला आहे. तथापी त्यामुळे सदरचा जलतरण तलाव बंद ठेवणे हा त्यास पर्याय नाही. जलतरण तलावाच्या ठेकेदार एजन्सीने लाखो रुपये खर्च केलेले आहेत. त्यामुळे तसेच जलतरण तलाव होण्यासाठी बरेच नागरिकंानी मासिक, वार्षीक पैसे भरुन पोहण्याचे पास काढलेले आहेत. त्यांचे हित लक्षात घेता जलतरण तलाव चालु करण्यात यावा अशी भूमिका आहे. या सध्याच्या परिस्थितीमध्ये मार्ग काढून योग्य ती कार्यवाही चालू ठेवून तलाव मनपामार्फत चालू व्हावा, या तलावाचे पाणी सोडण्यात आलेले आहे. आता पुन्हा पाणी भरण्यास वेळ लागणार आहे. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. सध्या पोहण्याचा सिझन नाही. परंतु ज्यांनी मासिक, वार्षिक तिकीटे काढलेली आहेत त्यांचेसाठी मार्ग काढून तलाव चालू करावा व तसेच पाणी भरण्यास सुरुवात करावी.

३) मा.श्री.दिप चव्हाण - तलावामध्ये आतापर्यंत क्षिरसागर, भळगट इ. युवकांचा मृत्यु झालेला आहे. जलतरण तलावाच्या करारनाम्यात त्रुटी आहेत. १-१ लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. करारनाम्यातील त्रुटी आताच पाहण्यात आल्या. तत्पुर्वी करारनाम्यामध्ये त्रुटी नव्हत्या काय? पहिला, दुसरा व तिसरा अपघात झाल्यानंतर त्रुटी लक्षात आल्या काय. त्यावेळी जबाबदारी का पाहिली नाही.

आता अपघात झालेल्या युवकांनी तिकीट काढले होते काय. त्या तिकीटाचा नंबर काय होता व मुलाचे वय काय होते.

जलविहारबाबत पर्याय काढणे आवश्यक आहे. तलाव बंद ठेवणे योग्य नाही. सध्या तलाव बंद ठेवलेला आहे काय. तो चालु केव्हा करणार. याबाबत उपाय काय आहेत. अशा त-हेच्या घटना घडू नये याबाबत चर्चा करण्यात यावी.

याबाबत मेकॅ.इंजि.श्री.निकम यांनी खुलासा केला.

४) मा.श्री.कैलास गिरवले - यापूर्वी दोन दुर्दैवी घटना घडल्या व आताची घटना धरुन तीन दुर्दैवी अंत झाले आहेत. याला जबाबदार तलावाचे ठेकेदार माजी सैनिक संघाची संस्था आहे. त्यांना जबाबदार धरुन त्यांचेवर कारवाई करण्यात यावी. तथापी तलाव बंद करण्याचा विचार न केलेला बरा. जे लोक मासिक, वार्षिक पास काढून पोहण्यास येतात व जेष्ठ नागरीक आहेत त्यांचेसाठी तलाव चालु ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधीत ठेकेदारावर कारवाई जरुर करावी परंतु तलाव बंद करण्यात येउ नये. पूर्वी नगरपरिषदेचे कर्मचारी तलावावर काम करीत होते. त्या कर्मचा-यांना घेउन तलाव चालू करता येउ शकतो. फक्त पास धारकासाठी तलाव चालू करावा.

५) मा.श्री.भगवान फुलसौंदर - यावर उहापोह केलेला आहे. जलतरण तलावाची सुविधा चांगली आहे. झालेल्या घटना दुर्दैवी आहेत. मृतांच्या नातेवाईकंाना एक-एक लाखाची मदत देण्यात आलेली आहे. मदत करणे हे ठेकेदाराचे कर्तव्य होते. येथून पुढे घटना घडणार नाहीत, याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. तलाव बंद ठेवणे योग्य आहे काय. तर किती दिवस बंद ठेवणार. सर्व मुलभूत सोयींबरोबर पोहण्याची सेवा दिली गेली पाहिजे. याबाबत कायदेशीर कारवाई जरुर करा. तसेच कायदेशीर मत घेउन तलाव चालु करावा.

६) मा.श्री.मुदस्सर शेख - यापुर्वी झालेल्या घटना दुर्दैवी आहेत. मयत मुले ही त्या कुटूंबाचा आधार होती. याचा विचार करता फर्मान खान आजाद खान पठाण यांना देखील क्षीरसागर व भळगट कुटूंबियाप्रमाणे रूपये एक लाख मदत देणेत यावी.

७) मा.श्री.अशोक कानडे - क्षिरसागर, भळगट, पठाण यांचा दुर्दैवी मृत्यु झाला. क्षिरसागर या युवकाचा मृत्यु झालेला होता. त्यावेळेस भावना तिव्र होत्या. भळगट, पठाण यांचेबाबत संस्था कशी जबाबदार आहे, याबाबत चर्चा झालेली आहे.

ख-या अर्थाने निर्णय घेणे आवश्यक आहे. नियमानुसार कार्यपध्दती निश्चित करावी. भविष्यात घटना घडून येणार नाहीत. याबाबत समन्वयाचा अभाव दिसून येत आहे. संस्थेवर कारवाई करावयाची आहे. नवीन अटी व नियम करताना इतर महानगरपालिकेचे जलतरण तलाव कशा प्रकारे चालविले जातात याचा याबाबत सांगोपांग विचार करुन मनपा तलावावर नियंत्रण करणेसाठी सक्षम यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

अहमदनगर शहरात एकच जलतरण तलाव आहे. या तलावाचा सर्वांनाच फायदा होतो. तलाव बंद ठेवून फायदा नाही. तलाव चालु राहीला पाहिजे व तातडीने चालु करावा. यापुर्वी तीन घटना घडल्याचा अहवाल स्पष्ट आहे. क्षिरसागर यांच्या घटनेनंतर कोणतेही निर्देश दिलेले नाहीत. त्यावर विचार करणे आवश्यक आहे.

कार्यपध्दतीबाबत नियमावली करण्याची गरज आहे. भळगट व क्षिरसागर यांचा ज्या वेळी अपघात घडला त्याच वेळेस संस्थेने इन्शुरन्स केले असते तर त्याबाबतची माहिती मला उपलब्ध करुन देणे.

तलावाबाबत समितीने त्रुटी अहवाल दिलेला आहे. युवकाच्या मृत्युनंतर डेथ सर्टिफिकेट पाहून त्याची कारणे नमूद करणे व त्यावरुन भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, अशा उपाययोजना कराव्यात. चांगल्या पध्दतीची यंत्रणा कार्यान्वीत करावी. नियमावली तयार करुन जलतरण तलाव चालु करावा.

८) मा.श्री.अनंत जोशी - जलतरण तलावाचा विषय गंभीर स्वरुपाचा आहे. जलतरण तलाव हा अहमदनगर शहरातील ऐतिहासिक तलाव आहे. याची निर्मिती ४० वर्षापूर्वी झालेली आहे. घटना घडली त्याबाबत तांत्रिक दोष आहे काय याची तपासणी केली पाहिजे. मृतांच्या नातेवाईकंाना मदत दिली जाणार आहे हे चांगले आहे. ऑफिस रिपोर्टामध्ये " तलावाचा ठेका मा.महासभेच्या मंजुरीने रदद करुन पुन्हा जाहीर निविदा देवून दुस-या एजन्सीला ठेका देणे अथवा तरण तलावाचा लिलाव करुन त्याचे खाजगीकरण करणे योग्य राहील असे मत आहे." त्याबाबत

मनपा सक्षम असेल तर नियमावली काटेकोर करावी व महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भुर्दंड होणार नाही, हे पहावे.

यावर मा.उपमहापौर श्री.सुळ यांनी खुलासा केला.

९) मा.श्री.नरेंद्र कुलकर्णी - तलावाबाबत अतिरिक्त गोष्टी तपासून पहाव्यात. तसेच तलावात जाळी बसविणेबाबत कार्यवाही करावी म्हणजे अशा घटना घडणार नाहीत.

१०) मा.श्री.अभय आगरकर - अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. जलतरण तलाव चालु राहो न राहो परंतु महानगरपालिकेच्या तलावामध्ये जलतरण सुविधा नागरीकांना देणे कायदयाने बंधनकारक आहे. तलाव बंद करणे  हा पर्याय होउ शकत नाही. कायदेशीर बाबी पाहिल्यातर अडथळा निर्माण होणार आहे. यामध्ये मध्यम मार्ग म्हणजे समोरच्या संस्थेला बोलावून घेवून त्यांनी केलेला खर्चाबाबत कॉम्प्रोमाईज करुन खर्च भरुन देउ शकतो. किंवा त्यानंतर ठेका रदद करु शकतो.

जलतरण तलाव चालु राहीला पाहिजे. इतर खाजगी तलाव महाराष्ट्रामध्ये वेगवेगळया ठिकाणी चालु आहेत. त्याचा अभ्यास करावा व याबाबत चांगली डीड करु शकतो. महापालिका कर्मचा-यांवर तलाव चालविण्यास सक्षम आहे काय. पूर्वी तलावात पोहणा-या नागरिकांची संख्या कमी होती. आता खूपच वाढलेली आहे. याबाबत चांगल्या अटी शर्ती सुचवाव्यात व मध्यम भूमिका घेउन हा प्रश्न सोडवावा.

११) मा.श्री.शंकरराव घुले - तीन वर्षामध्ये तीन अपघात झालेले आहेत. ठेकेदाराविषयी विचार करणे आवश्यक आहे. मा.श्री.कृ.द.जाधव यांनी सांगितल्याप्रमाणे सदर बाबत कराराचा भंग ठेकेदाराने केलेला आहे. ठेका रदद करण्यास अडचण येणार नाही. संस्थेला शासन जरुर करावे तसेच याबाबत नाशिक, मुंबई, पुणे येथील पध्दती पाहून त्याचा अभ्यास करावा व सध्याचा ठेका रदद करावा. मी नगराध्यक्ष असताना अशा घटना घडलेल्या आहेत. महापालिकेने महिना दोन महिने तलाव चालवुन पहावा. तांत्रिक गोष्टी तपासून पहाव्यात. लोकांना कमी पैशात सुविधा उपलब्ध करुन देउ शकतो काय हे पहावे. ठेकेदाराने कराराचा भंग केल्यानंतर पर्यायी व्यवस्था करुन देणे हे मनपाचे कर्तव्य आहे. यावर अधिकारी, इंजिनिअरची देखरेख ठेवावी.

१२) मा.श्री.आसाराम कावरे - तलावामध्ये ज्या दुर्देवी घटना घडल्या त्यास माजी सैनिक संघ जबाबदार आहे. मनपाचा काही संबंध नाही. मनपाने तलाव चालवावा. माजी सैनिकांनी भरपाई दिली पाहिजे. प्रत्येक मृताच्या नातेवाईकास एक-एक लाख रुपये दयावेत.

१३) मा.श्री.दिपक सुळ, उपमहापौर - अहवाल पाहिला असता ठेका रदद करणे अशा बाबतचा प्रस्ताव आहे. ठेका रदद करणेबाबत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यामुळे ठेका रदद करु शकत नाही.

१४) मा.श्री.शंकरराव घुले - आपण ठेका रदद करु शकतो.

१५) मा.श्री.कैलास गिरवले - अहवालावरुन ठेका रदद करु शकतो.

१६) मा.श्री.नामदेव पवार, विरोधी पक्ष नेता - अहवाल स्पष्ट झालेला आहे.

१७) मा.श्री.सतिष मैड - सदस्यांच्या भावना लक्षात घेउन ठेका रदद करावा.

त्यानंतर सभागृहात गोंधळ झाला. त्यानंतर मा.महापौर यांनी खुलासा केला.

१८) मा.श्री.दिपक सुळ, उपमहापौर - माजी सैनिक संघाने तलावाकरिता खर्च करुन चांगल्या सुविधा दिलेल्या आहेत. मात्र आता मनपाने तलाव चालवावयाचा असल्यास स्त्री रक्षक गार्ड नाहीत तसेच जीवरक्षक कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत.

१९) मा.श्री.भानुदास कोतकर - मनपाने तलाव चालु करणेबाबत कमिटी करुन निर्णय घ्यावा. कायदेशीर अहवाल वाचून दाखवावा. यावर श्री.निकम, मेकॅ.इंजि. यांनी अटीशर्ती वाचून दाखविल्या.

२०) मा.श्री.शंकरराव घुले - अहवालामध्ये स्पष्ट म्हंटलेले आहे. सर्व अटीशर्तीचा भंग झालेला आहे. एजन्सी रदद करावी पर्याय शोधावा.

२१) मा.श्री.नामदेव पवार, विरोधी पक्षनेता - इतर मनपातील माहिती घेण्यासाठी कमिटी नेमावी. तलावामध्ये मृत्यु घडतात ते घडू नये याकरिता उपाययोजना करावी व ठेका रदद करणेबाबत सुचविले.

२२) मा.श्रीमती.वर्षा आरिफ - नवीन ठेकेदाराची गॅरंटी काय आहे.

२३) मा.श्री.सतिश मैड - अपघात सारखे होत नाहीत. ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे झालेले आहेत. मृत्यु रोखणे आपल्या हातात आहे. हा हलगर्जीपणाचा विषय आहे. अपघाताचा नाही. संस्थेला किती वेळा पाठीशी घालावे याचाही विचार करावा. करारनामा रदद करावा अशी विनंती आहे. व चांगले जलतरणपटू पाहून त्यांना नेमावे.

२४) मा.आयुक्त - कस्टोडीयन म्हणून सर्व जबाबदारी आहे. इतर शाब्दीक तारतम्य बाळगले पाहिजे. ठेकेदाराने दर वाढविणेबाबत पत्र दिले होते. खर्चाचाही विचार केला गेला पाहिजे. तलाव बंद केल्यामुळे कायदेशीर त्रास होणार नाही. ही एक संस्था आहे. मनपा तलाव चालवू शकते काय चांगल्या सुविधा आहेत. ठेका रदद करावा काय याकरिता वर्तमानपत्रामध्ये जाहीर करावे लागेल. मा.महापौर यांनी खुलासा केला की, तलाव चालविण्याकरिता कोणीही निविदा भरलेल्या नव्हत्या. ही संस्था स्वत:हून पुढे आलेली आहे.

२५) मा.श्री.नामदेव पवार, विरोधी पक्षनेता - पहिला मृत्यु झाला त्यावेळेस काय उपाययोजना केली.

२६) मा.श्री.कृ.द.जाधव - मा.आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे तलाव चालु होणे अत्यंत गरजेचे आहे.

२७) मा.श्री.अभय आगरकर - लिगल ओपिनियन घ्यावे.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, सर्व पक्षीय कमीटी नेमून निर्णय घेवू.

-- * --

**ठराव :** सांगोपांग चर्चा अंती असे ठरविण्यात येते की, झालेल्या दुर्दैवी घटनेमुळे पठाण कुटूंबियांची झालेली हानी पाहता फर्मान खान आजाद खान पठाण यांचे दुर्दैवी झालेल्या मृत्युबद्यल एक लाख रूपये मदत पठाण कुटूंबास देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. खर्च मंजुर नियमानुसार कार्यवाही करावी. जलविहार सध्या आहे त्या व्यवस्थापनाखाली म्हणजेच माजी सैनिक संघा मार्फत त्वरित चालु करण्यांत यावा. होणा-या वारंवार दुर्घटनेबाबत खालील सदस्यांची समिती नेमण्यात येत असुन या समितीने इतर जलतरण तलाव तसेच तांत्रिक सल्लागार यांचेशी विचार विनिमय व सल्लामसलत करून दुर्घटना टाळणेस्तव जलविहार

सुधारणा करणेबाबतचा अहवाल सादर करावा. समितीने सादर केलेल्या अहवाला बाबत माजी सैनिक संघाचा खुलासा घेण्यांत यावा. याबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

समिती सदस्यांची नांवे -

मा.श्री.दिपक सुळ

मा.श्री.अभय आगरकर

मा.श्री.भगवान फुलसौंदर

मा.श्री.सुनिल कोतकर

मा.श्री.बहिरनाथ वाकळे

सुचक : मा.श्री.नामदेवराव पवार

अनुमोदक : मा.श्री.कृ.द.जाधव

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : ३-११-२००७.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिका कर्मचा-यांना (मेडिकल) वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना लागु करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : सध्या महानगरपालिका कर्मचा-यांना अॅवार्डमधील तरतुदीनुसार वैद्यकीय भत्ता दरमहा २५/- वेतनामध्ये अदा करणेत येतो. एखाद्या कर्मचा-यांस गंभीर स्वरुपाचा आजार झाल्यास उदा. कॅन्सर, ब्रेन ट्यूमुर, पक्षघात, किडनीचा आजार, आतड्याचा आजार, अपघात, हृद्यायाचा आजार अशा स्वरुपाचे आजार झाल्यास त्यासाठी किमान २५,०००/- हजारापासुन ३ ते ४ लाख खर्च येतो. अशावेळी दर महा मिळणा-या वैद्यकीय भत्यातुन खर्चाची तोंड मिळवणी करणे शक्य होत नाही.

याकरीता सामन्य प्रशासन विभाग यांनी दिनांक ७-२-२००७ रोजी रिपोर्ट ठेवुन शासन निर्णयानुसार वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना चालु करणेत यावी यासाठी तीन अधिकारी व एक लिपिक यांची कमिटी नेमण्यांत आली सदर कमिटीमध्ये १. श्री. आर.ए.देशमुख, प्रभारी उपायुक्त तथा सहाय्यक आयुक्त २.श्री.आर.एम.ढाकणे, प्रभारी उपायुक्त तथा कामगार अधिकारी ३.श्री. पी.आर.टेकवानी, मुख्य वैद्यकीय अधिकारी ४.श्री.आर.टी. आढाव, माहिती सुविधा केंद्र प्रमुख यांची जा.क्र. सामन्य प्रशासन विभाग ३३७९ दिनांक २०-२-२००७ अन्वये समिती नेमुन इतर महानगरपालिका तसेच शासन निर्णय यांचा अभ्यास करुन मा. आयुक्त साहेब यांचेकडे प्रस्ताव सादर करणे बाबत आदेश देणेत आले.

सदर समितीने मालेगांव महानगरपालिका, सांगली / मिरज आणि कुपवाडा महानगरपालिका, जळगांव महानगरपालिका, औरंगाबाद महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, पिपंरी चिचंवड महानगरपालिका इत्यादी महानगरपालिकेकडुन माहिती घेवुन त्याबाबतचा अहवाल खालील प्रमाणे

सांगली / मिरज आणि कुपवाड महानगरपालिके कडील पत्र क्र.म.न.पा./ आस्थापना विभाग ५/२९६/२००७ दिनांक १६-३-२००७ अन्वये पत्र देवुन कळविले की, महाराष्ट्र शासन निर्नय क्रमांक एम.एम.जी. १०९५/सी.आर. ४५ / ९५ आरोग्य ३ दिनांक ४ जुलै २००० अन्वये शासकीय कर्मचारी व त्यांचे कुटुबियांना अकस्मित निकडीच्या प्रसंगी रुग्नालयात अंत रुग्न म्हणुन घेतलेल्या औषधोपचाराच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी एकुण २७ आजारांना औषधोपचार घेण्यास मान्यता दिलेली आहे. मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ६ कलम ६६ (१८) मधील तरतुदीनुसार महानगरपालिका कर्मचारी किंवा त्यांच्या कोणत्याही वर्गाच्या कल्याणकारी योजना करणेचे महानगरपालिकेला आहे. याबाबत त्यांनी महासभा क्रमांक १९४ दिनांक २०-१२-२००० व महासभा ठराव क्रमांक ३२ दिनांक २०-४-२००५ अन्वये सदरचे नियम लागु करुन घेतलेले आहे.

जळगांव महानगरपालिकेने त्यांचेकडील जा.क्र. ज.म. न. पा. / आस्थापना ५७२१ /२००७ दिनांक २१-३-२००७ अन्वये पत्र देवुन आस्थापना सुचीवरील कायम कर्मचा-यांना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एम.ए.जी.२००५/९ / प्र.क्र.१. / आरोग्य ३ दिनांक १९ मार्च २००५ नुसार व त्या संबधी शासन निर्णयानुसार वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करणेत येते याबाबत त्यांनी महानगरपालिका महासभेत ठराव केलेला असुन त्याची प्रत सोबत जोडली आहे.

मालेगांव महानगरपालिकेकडील जा.क्र. आस्थापना ३८ दिनांक ४-४-२००७ नुसार पत्र देवुन सध्या महानगरपालिका कर्मचा-यांना वैद्यकीय भत्ता अदा केला जात नाही असे कळविलेले आहे.

जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडे समक्ष जावुन चौकशी केली असता महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ नुसार वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती दिली जाते असे सांगण्यांत आले.

अहमदनगर महानगरपालिकेतील कायम आस्थापना सुचीवरील कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना लागु करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ६ कलम ६६ (१८) नुसार महानगरपालिका कर्मचा-यांच्या किंवा त्यांच्या कोणत्याही वर्गाच्या कल्याणासाठी अन्य कोणत्याही उपाय योजना लागु करणे झाल्यास त्याबाबत महासभेत ठराव मांडुन तो पारीत झाल्यानंतर कर्मचा-यांना शासन निर्णय क्रमांक एम.ए.जी.२००५ / ९ प्र.क्र.१ आरोग्य ३ दिनांक १९ मार्च २००५ व तदसंबधी शासन निर्णयानुसार वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्तीची कार्यवाही करता येतील. तसेच सदर योजना लागु झ ाल्यानंतर सध्या मिळत असलेल्या ॲवार्ड नुसार दरमहा मिळणारा वैद्यकीय भत्ता बंद करावा लागेल. सदर योजना लागु झाल्यास आजारांचा विचार करतांना कर्मचारी स्वतः व त्यांचे कुटुंबाचा समावेश ठेवणे आवश्यक आहे.

कुटुंब म्हणजे

१. शासकीय कर्मचा-यांची पत्नी किंवा पती.
२. शासकीय कर्मचा-यांवर अवलंबुन असतील अशी शासकीय कर्मचा-यांची औरस मुले, सावत्र मुले, कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.
३. शासकीय कर्मचा-यांवर पुर्णपणे अवलंबुन असलेले शासकीय कर्मचा-यांचे आई, वडील.( महिला शासकीय कर्मचा-यांला तिच्यावर पुर्णपणे अवलंबुन असलेल्या आणि तिच्या बरोबर राहत असलेल्या तिच्या आई वडिलांची किंवा तिच्या सासु सास-याची निवड करता येईल.)
४. शासकीय कर्मचा-यांवर पुर्णपणे अवलंबुन असलेला १८ वयाखालील अविवाहीत भाऊ.
५. शासकीय कर्मचा-यांवर पुर्णपणे अवलंबुन असलेल्या (वय लक्षात न घेता) अविवाहित बहिण.

तरी सदर समितीने या बाबतचा वरील प्रमणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती मिळणेसाठी अभ्यास केलेला असुन त्याबाबतचा अहवाल आदेशार्थ अवलोकनासाठी व मंजुरीसाठी ठेवण्यांत येत आहे.

यावर अंतर्गत लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्ताव "अ" प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही, तथापि अंदाजपत्रकीय तरतुद होणे आवश्यक.

यावर प्र.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे सध्या ॲवॉर्ड नुसार मिळणारा वैद्यकिय भत्ता नगण्य स्वरूपाचा असुन प्रस्तावात नमुद केलेल्या आजारासाठी मोठा खर्च येतो सध्या अशा घटना घडल्या आहेत. याचा विचार करता सध्या असलेला वैद्यकिय भत्ता बंद करून वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती योजना शासन निर्णयाप्रमाणे लागु करून योग्य होईल. सदर योजना महानगरपालिका कर्मचा-यांना लागु करणे झाल्यास मा.महासभेची मान्यता आवश्यक आहे. तरी आदेशार्थ.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, शासनाचे आदेशानुसार कार्यवाही करावी.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा फेरसादर रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी त्यांचे कडील जा.क्र. ५८/२००७ दिनांक १/९/०७ रोजी पत्र देवुन अहमदनगर महानगरपालिका कर्मचा-यांना शासन निर्णया नुसार वैद्यकिय खर्चा प्रतिपुर्ती योजना लागु करावी व ॲवार्ड तरतुदीनुसार सध्या लागु असलेली दर महा रु.२५/- वैद्यकिय भत्याची तरतुद रद्द करावी असे कळविलेले आहे सदर कामी आवश्यक व उचित कायदेशिर कार्यवाहीस आमची युनियन पुर्णतः प्रतिसाद देईल अशी गव्ही देणे बाबत नमुद केले आहे.

तत्कालीन नगरपरिषदे मध्ये रेफ(आय.टी) ५१/७९ मधील तरतुदीनुसार नगरपरिषद कर्मचा-यांना दर महा वैद्यकिय भत्ता रु.२५/- अदा करण्यात येत होता सदर ॲवार्डर्ची मुदत संपल्यानंतर शहरपालिका कामगार युनियन यांनी नविन मागण्याची नोटीस दिली त्या मध्ये वैद्यकिय भत्या पोटी दर महा रु.७५/- मिळाण्याची मागणी केली मागण्या बाबत तडजोड न झाल्यामुळे शासनाने रेफ(आय.टी) २,३ व ४/९३ ही मा.औद्योगिक न्यायाधिकरण अहमदनगर यांचे समोर निर्णयास्तव सुपुर्द केले सदर रेफ मध्ये मा.औद्योगिक न्यायाधिकरण अहमदनगर यांनी अंतिम निर्णय दिलेला असुन त्या मध्ये सर्व कायम कर्मचा-यांना वैद्यकिय भत्या पोटी दर महा रु ४०/- दिनाक १/१/८७ पासुन अदा करण्याबाबत आदेश दिलेले आहे सदर ॲवार्ड आज रोजी अस्तिवात असुन त्या मध्ये तरतुदी महानगरपालिका व कर्मचारी यांचेवर बंधन कारक आहे.

अहमदनगर महानगरपालिकेतील कायम आस्थापना सुचीवरील कर्मचा-यांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती लागु करणे साठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण -६ कलम ६६ ( १८) नुसार महा सभेत ठराव मांडुन तो पारित करुन घ्यावा लागेल व त्या ठरावा नुसार व कामग़ार युनियन यांनी दिलेल्या संमती नुसार दर महा देण्यात येणारा वैद्यकिय भत्ता बंद करुन शासन निर्णय क्र.एम.ए.जी.२००५ /९ प्र.क्र.१ आरोग्य - ३ दिनांक १९ मार्च २००५ व तद संबधीत शासन निर्णयानुसार वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्तीची कार्यवाही करणे उचीत वाटते आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित आदेशार्थ सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्ताव महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणेत यावा.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट अंतर्गत लेखा परिक्षक,मा.प्र.उपायुक्त (सा) मा.आयुक्त साहेब,मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह व सहाय्यक आयुक्त यांचे फेरसादर रिपोर्टासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

-- ** --

चर्चा

१) मा.श्री.अनंत जोशी - सदर विषय मंजूर करण्यास हरकत नाही. मात्र अपघातीबाबत विमा उतरविण्यात आला आहे काय. याबाबत सहा.आयुक्त यांनी खुलासा केला.

२) मा.श्री.अशोक कानडे - हा विषय यापूर्वीच घ्यावयास पाहिजे होता व तशी कर्मचा-याची गरज होती. विम्याबाबतचा विषय आणि हा विषय यामध्ये जम्बलींग होत आहे. सध्या आलेला विषय हा कर्मचा-यांना वैदयकीय खर्चाची प्रतिपुर्ती याबाबत आहे. याबाबत मा.आयुक्त यांनी खुलासा करावा. तसेच याबाबत मानधनावरील कर्मचा-यांना ही योजना लागू आहे काय अशी विचारणा केली असता सहा.आयुक्त यांनी खुलासा केला की, ही योजना मानधनावरील कर्मचा-यांना लागू होणार नाही. त्यावर मा.श्री.कानडे यांनी वैदयकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मान्यताप्राप्त हॉस्पीटलची यादी निश्चित केली आहे काय. मान्यताप्राप्त हॉस्पीटलची यादी निश्चित करावी. यास मा.श्री.अनंत जोशी यांनी अनुमोदन दिले.

३) मा.श्री.शंकरराव घुले - सदरचा एक चांगला प्रस्ताव सभेपुढे मांडला. याबददल मी प्रशासनाचे अभिनंदन करतो. संघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी ही एक चांगली योजना आहे. विषय मंजूर करण्यास विनंती आहे.

४) मा.श्री.आसाराम कावरे - सदरचा विषय मंजूर करण्यास हरकत नाही.

५) मा.श्री.दीप चव्हाण - ही योजना कर्मचा-यांना कधीपासून व कशाप्रकारे लागु होणार आहे. या योजनेकरिता हॉस्पीटलची यादी पत्र देउन निश्चित करावी. तसेच पेन्शनर लोकांना आर्थिकदृष्टया योजना लागु करावी. याच्यात काही आजार नमूद केलेले आहेत. इतर आजारांचे काय? कर्मचा-यांना ५१/७९ ॲवार्डच्या तरतुदी लागु आहेत. वारसा हक्क नोकरीबाबत १६५ कर्मचा-यांना घेतलेले नाही. याबाबत शासनाचा अभिप्राय मागवून कारवाई करणार आहेत काय?

शासकीय वैदयकीय प्रतिपूर्ती योजना लागू करणेबाबत मुख्य लेखाधिकारी श्री.कर्डीले यांनी खुलासा केला.

६) मा.श्री.भाउसाहेब उडाणशिवे - कागद, काच, पत्रा या असंघटीत कामगारांच्या आरोग्य विषयक कार्यवाहीबाबतचा प्रश्न उपस्थित केला.

ठराव : अ) ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार ठरविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेतील कायम कर्मचा-यांसाठी वैद्यकिय प्रतिपुर्ती योजना लागु करणेबाबतचे विषयास मा.शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात येत असुन कायम कर्मचा-यांना देत असलेला दरमहा वैद्यकिय भत्ता प्रत्यक्ष योजना अंमलात येईल त्या संबंधित महिन्यापासुन वैद्यकिय भत्ता देणे बंद करणेत यावा. सन २००८ - २००९ या आर्थिक वर्षाकरीता अंदाजपत्रकात तरतूद करणेबाबत कार्यवाही करावी. यास्तव दि. १-४-२००८ पासून अमंलबजावणी करण्यात यावी. खर्च मंजुर नियमानुसार कार्यवाही करावी.

ब ) मा.सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार या व्यतिरिक्त देखील विषयांकीत रुग्ण यांना सदर योजनेचा लाभ घेता यावा यास्तव अहमदनगर शहरातील पुढील इस्पीतळांचा समावेश करणेत येत आहे.

१. नोबेल हॉस्पीटल
२. डौले हॉस्पीटल
३. डॉ.काळोखे हॉस्पीटल
४. डॉ.सोमाणी हॉस्पीटल
५. डॉ.दिपक हॉस्पीटल
६. डॉ.अकोलकर हॉस्पीटल
७. डॉ.दर्शन गोरे हॉस्पीटल

या इस्पितळांच्या सेवेच्या खर्चाची प्रतिपुर्ती करता यावी याकरीता मा.शासनाची मंजुरी घेण्यात यावी.व मंजुरी प्राप्त झाल्यानंतरच अंमलबजावणी करणेत यावी.

सुचक : मा.श्री.उडानशिवे भाउसाहेब भिमाजी
अनुमोदक : मा.श्री.कानडे अशोक नाथा
ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दिनांक : ३-११-२००७.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिकेतील कर्मचा-यांना सन २००६-०७ या आर्थिक वर्षात सानुग्रह अनुदान देणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : मा.श्री.लोंढे सुभाष सोपानराव, सभापती स्थायी समिती, मा. श्री. किशोर आसाराम डागवाले, सभागृह नेता, मा.डॉ. सौ. योगिता रणजित सत्रे, सभापती, महिला व बाल कल्याण समिती, मा. श्री. शेख अरिफ़ शेख रफ़ियोद्दीन, नगर सेवक मा. श्री. तिवारी सुरेश रतनप्रसाद,नगर सेवक, मा. श्रीमती. बोरुडे इंदुबाई परशुराम, नगरसेविका, मा. श्रीमती. पवार संध्या बाळासाहेब, नगरसेविका यांनी पत्र देवुन "अहमदनगर महानगरपालिकेच्या बजेट हेडवर कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत तरतुद करण्यात आलेली आहे. तरी चालु वर्षी (२००७) अहमदनगर महानगरपालिकेतील कर्मचा-यांना रुपये ६,०००/- सानुग्रह अनुदान देणे बाबतचा विषय येत्या (दिपावली पुर्वीच्या) मा. सर्वसाधारण सभेत घेवुन त्यास मंजुरी देणेत यावी" अशी विनंती केलेली आहे.

तसेच अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी सुध्दा दिनांक २६-९-२००७ रोजी पत्र देवुन कामगारांना दिपावली सणासाठी बोनस व सानुग्रह अनुदान देणे बाबत विनंती केलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये सध्या आस्थापना कायम सुचीवर २५५० कर्मचारी कार्यरत आहेत. सन २००७-२००८ या वर्षातील आर्थिक संकल्पामध्ये सानुग्रह अनुदान या शिर्षकाखाली टोकण तरतुद ५,००,०००/- इतकी केलेली आहे.

मा. शासनाने राज्य शासकीय व महागाई भत्ता पात्र इतर कर्मचा-यांना दिवाळी बोनस सन १९९९ पासुन देण्यांत आलेला नाही. त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना हा बोनस अनुदान देणेत येत नाही.

तरी महानगरपालिकेमधील महागाई भत्ता अनुदान पात्र कर्मचा-यांना बोनस व सानुग्रह अनुदान देणे बाबतचा निर्णय धोरणात्मक असल्यामुळे त्याप्रमाणे निर्णय घेणे योग्य होईल आदेशार्थ सादर.

यावर अंतर्गत लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, सहा.आयुक्त यांचे कडील प्रस्तावाप्रमाणे सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाच्या सन २००७-२००८ चे अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे बोनस व सानुग्रह अनुदान अदा करावयाचे झाल्यास महानगरपालिका लेखासंहिता १९७१ मधील नियम २८,२९ व ३० प्रमाणे कार्यवाही करणे योग्य.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, (१) शासनाने कर्मचा-यांना बोनस सन ९९ पासुन मंजुर केलेला नाही. शासनस्तरावर दिवाळी बोनस देण्याबाबत निर्णय झाल्यास महानगरपालिका कर्मचा-यांना मा.महासभेची मंजुरी घेवुन बोनस देता येईल. बोनससाठी अंदाजपत्रकात तरतुद नाही. (२) कर्मचारी सानुग्रह अनुदानासाठी सन ०७-०८ च्या अंदाजपत्रकात रू.५.०० लाख रकमेची तरतुद केली आहे. एकुण २५५० कर्मचा-यांना प्रत्येकी रू.६०००/- प्रमाणे सानुग्रह अनुदान मंजुर करावयाचे असल्यास रू.१ कोटी ५३ लाख खर्च करावे लागतील. तरतुद रू. ५.०० लाख वजा जाता १ कोटी ४८ लाख वाढीव अनुदानाची तरतुद आस्थापना शाखेने करणे गरजेचे राहील. माहे डिसेंबर ०७ मध्ये पुनर्विनियोजनाच्या वेळी वाढीव तरतुद करावी लागेल.

शासनाने बोनस मंजूर केल्यास बोनससाठी लागणा-या रक्कमेची परिगणना करुन व सानुग्रह अनुदानापोटी वाढीव रक्कमेची तरतुद सन ०७-०८ च्या पुनर्विनियोजन अंदाजपत्रकात करावी. याबाबतचा निर्णय मा.महासभेने घेणे उचित राहील.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा फेरसादर रिपोर्ट की, दिनांक १७/१०/२००७ रोजी मा.आयुक्त साहेब यांचेशी झालेल्या समक्ष चर्चेनुसार सानुग्रह अनुदानाबाबत इतर मनपा मध्ये दुरध्वनी करुन चौकशी केली असता खालील प्रमाणे महानगरपालिका यांनी मागील वर्षासाठी सानुग्रह अनुदान दिलेले आहे.

| | | २००५-२००६ | २००६-२००७ |
|---|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर | ४,८००/- | अद्याप निर्णय नाही. |
| २ | भिवंडी | ४,२००/- | |
| ३ | नाशिक | ५,०००/- | |
| ४ | औरंगाबाद | २,५००/- | |
| ५ | जळगांव | -- | |
| ६ | धुळे | -- | |

वरील मनपा यांनी चालु वर्षासाठी सानुग्रह अनुदान देणे बाबत अद्याप पर्यंत निर्णय झालेला नाही असे सांगितलेले आहे. तरी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सामान्य) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित नुसार इतर महानगरपालिकेने दिलेल्या मागील वर्षांचे सानुग्रह अनुदानाचे अवलोकन होवुन आदेशास्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा फेरसादर रिपोर्ट की, दिनांक १९/१०/२००७ रोजी महानगरपालिका कामगार युनियनचे प्रतिनिधी व प्रशासन यांचेमध्ये मा.आयुक्त यांचे दालनात ४-०० वाजता संयुक्त बैठक झाली. सदर बैठकीमध्ये मनपा कर्मचा-यांना सन २००६-२००७ या वर्षासाठी १ महिन्याच्या पगारा एवढी रक्कम विना अट बोनस / सानुग्रह अनुदान देण्याची संघटनेने मागणी केलेली आहे.

याबाबत प्रशासना तर्फे इतर मनपा मध्ये देण्यांत आलेल्या सानुग्रह अनुदाना बाबत माहिती देण्यांत आली व एक महिन्याच्या वेतना इतकी रक्कम दिल्यास वर्ग-४ च्या कर्मचा-यांना कमी

रक्कम मिळेल व वरिष्ठ केडरचे कर्मचारी अधिकारी यांना जादा रककम मिळेल त्यामुळे रक्कमेत विसंगती राहील. याचा विचार करुन सर्व कर्मचा-यांना समान रक्कम देण्यांत यावी असे सुचविण्यांत आले.

मा.शासनाने बोनस मंजूर केल्यास बोनस साठी लागणा-या रक्कमेची परिगणना करुन व सानुग्रह अनुदानापोटी वाढीव रक्कमेची तरतुद करावी लागेल. सन २००७-२००८ अंदाज पत्रकामध्ये रुपये ५ लाखाची तरतुद करण्यांत आलेली आहे.

सदरचा निर्णय धोरणात्मक असल्याने मा.महासभेने निर्णय घेणे संयुक्तीक होईल. तरी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, "अ " प्रस्तावित नुसार सदर निर्णय धोरणात्मक असल्याने मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेकरीता मान्यतेस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट अंतर्गत लेखा परिक्षक,मुख्यलेखाधिकारी,मा.उपायुक्त (सा) मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह व सहाय्यक आयुक्त यांचे फेरसादर रिपोर्टसह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा : विषय क्र.३ - सानुग्रह अनुदान.

१) मा.श्री.अनंत जोशी - मंजूर करण्यास हरकत नाही.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - मंजूर करण्यास हरकत नाही.

३) मा.श्री.आसाराम कावरे - सानुग्रह अनुदानाचा विषय सभागृहापुढे मांडल्याबददल आभार मानतो. महानगरपालिकेला जकातीपासून मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळत आहे. दिवाळी, दसरा, रमजानईद, गोकुळआष्टमी इ. सणाच्या निमित्ताने अनुदान देण्यात येणार आहे. याबाबत मी मा.आयुक्त यांना बहुजन समाज पक्षाच्या वतीने विनंती करीत आहे. महापालिकेकडे पैसे शिल्लक असतानासुध्दाही कर्मचा-यांना दिले जात नाही. कर्मचा-यांची दिवाळी यावर्षी चांगली साजरी होण्याच्या दृष्टीने सुखसमृध्दी मिळण्याचे दृष्टीने सर्व नगरसेवकांना विनंती करतो, दिवाळीपुर्वी कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान म्हणून रु.१०,०००/- देणे आवश्यक आहे.

४) मा.श्री.संदीप कोतकर, महापौर - सानुग्रह अनुदानाबाबतचा खुलासा प्रशासनाने करावा असे सांगतले असता त्यावर सहा.आयुक्त यांनी खुलासा केला.

५) मा.श्री.शंकरराव घुले - या विषयाबाबत कामगार युनियनशी चर्चा प्रशासनाने केली आहे. मी नगराध्यक्ष असताना नगरपरिषदेच्या कर्मचा-यांना त्यावेळी ५६ दिवसाचा पगार बोनस म्हणून वाटलेला आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहीली असता उत्पन्न चालु आर्थिक वर्षात ब-यापैकी आहे. चालु आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये याबाबत बजेट तरतुद किती केली आहे. व एकूण खर्चासाठी किती तरतुद करावी लागेल या सर्वाचा विचार करुन व महानगरपालिकेच्या तिजोरीचा विचार करुन समन्वय साधून मंजूर करण्यास हरकत नाही. मात्र मा.आयुक्त यांनी आपण किती सानुग्रह अनुदान देउ शकतो व आर्थिक ताकद किती आहे, हे

सांगितले पाहिजे. आर्थिक धोरण सभागृहात ठेवले तर आम्ही निर्णय घेउ शकतो, याबाबतचा खुलासा करावा असे सुचविले.

६) मा.श्री.अनंत जोशी - सन १९९९ नंतर कामगार कर्मचा-यांना बोनस मिळालेला नाही. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली असेल तर कर्मचारी त्यापासून वंचित राहू नयेत. याकरिता चालु आर्थिक वर्षामध्ये इतर बजेट हेडवर खर्च न झालेले पैसे वर्ग करुन कर्मचा-यांना अनुदान दयावे. आम्ही भारतीय जनता पक्षाच्या वतीने रु.६०००/- प्रत्येकी अनुदान दयावे असे सुचवित आहोत. सर्व कर्मचा-यांना दिवाळीच्या शुभेच्छा.

७) मा.श्री.कृ.द.जाधव - पूर्वी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती आताच्या इतकी चांगली नव्हती. त्यावेळी सुध्दा आम्ही नगरपालिकेच्या रिझर्व फंडातून पैसे काढून कर्मचा-यांना बोनस दिलेला आहे. आता योगायोगाने महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. त्यामुळे योग्य निर्णय घ्यावा. वाटल्यास कर्मचा-यांकडून अंडरटेकींग घ्यावे व जे काही होईल त्यास वसुलपात्र असेल त्यामध्ये भिती बाळगण्याचे काही कारण नाही. त्यामुळे मा.श्री.आसाराम कावरे यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यास मी पाठींबा देउन तो प्रस्ताव मंजूर करावा अशी विनंती करतो.

८) मा.श्री.कैलास गिरवले - महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती कशी आहे. काही महानगरपालिकांनी गेल्या वर्षी जे सानुग्रह अनुदान दिलेले होते त्याची आकडेवारी ऑफिस रिपोर्टामध्ये आहे. मिरा-भाईंदर रू. ४८०० भिवंडी रू. ४२०० नाशिक रू. ५००० औरंगाबाद रू. २००० यांनी एवढे अनुदान दिलेले आहे. आपणही याबाबत कार्यवाही करावी तसेच प्रोबेशन वरील कर्मचा-यांचाही विचार करावा.

९) मा.श्री.दीप चव्हाण - श्री.गिरवले यांचे तत्व बरोबर आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीबाबत ऑफिस रिपोर्टामध्ये महापालिकेस किती देणे आहे, किती शिल्लक आहे हे विषयात यावयास पाहिजे होते. म्हणजे आर्थिक परिस्थितीचा आढावा घेताना हे समजले असते हव किती सानुग्रह अनुदान देता येईल याबाबत अर्थविभागाने खुलासा करावा व कर्मचा-यांना प्रत्येकी रु.१०००० सानुग्रह अनुदान दयावे.

यावर मुख्य लेखाधिकारी श्री.कर्डीले यांनी आर्थिक परिस्थितीबाबतचा खुलासा केला.

१०) मा.श्री.अभय आगरकर - महानगरपालिका कर्मचा-यांना किती सानुग्रह अनुदान देउ शकते.

११) मा.श्री.भगवान फुलसौंदर - सानुग्रह अनुदान देण्याचा विषय अभ्यासपूर्ण आहे काय. विषय अर्धवट आहे असे सांगितले. यावर मा.महापौर यांनी महानगरपालिका सभेपुढे विषय मांडताना प्रस्ताव अर्धवट येउ नये असे सांगितले.

१२) मा.श्री.सतिश मैड - रु.६०००/- सानुग्रह अनुदान आपण देउ शकतो काय. जास्तीत जास्त रक्कम देण्यात यावी.

१३) मा.श्री.अनंत जोशी - आर्थिक परिस्थितीनुसार मान्य करावा असे सांगितले.

१४) मा.श्री.संदीप कोतकर, महापौर - प्रशासनाने आपली भूमिका मांडावी, अशी विनंती केली.

१५) मा.आयुक्त - अंदाजपत्रकामध्ये सानुग्रह अनुदान देणेबाबत टोकन तरतुद करण्यात आलेली आहे व आर्थिक परिस्थिती पाहून तरतुद केलेली आहे. महापालिकेला जकातीचे उत्पन्न मिळत आहे. तरी सुध्दा इतर हेडवरील तरतुदी जवळजवळ संपलेल्या आहेत. कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत सहानुभूतीपूर्वक निर्णय घेत असताना कोणी रु.६००० दयावेत तर कोणी रु.१०००० दयावेत असे सुचविले आहे. तथापी एकत्रीत निर्णय होणे आवश्यक आहे.

१६) मा.श्री.अभय आगरकर - योग्य परिस्थितीपाहून निर्णय घ्यावा.

(सर्व पक्षीय नगरसेवकांच्या एकमताने निर्णय घेण्याबाबत सुचविण्यात आले व त्यांच्या चर्चेनुसार सभागृहात निर्णय जाहीर करण्यात येईल, असे सांगण्यात आले. ) त्यानंतर मा.महापौर यांनी सर्वानुमते रु.२०००/- प्रत्येक कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्याची शिफारस करीत आहे, असे सांगितले.

--*--

ठराव : सभागृहामध्ये झालेली साधक बाधक चर्चा व ऑफिस रिपोर्ट पाहता ठरविणेत येते की,

अहमदनगर महानगरपालिकेच्या कायम कर्मचा-यांना सन २००६-०७ याआर्थिक वर्षा साठी दिपावली सणानिमित्त कायम कर्मचा-यांना रक्कम रूपये दोन हजार (रू. २,०००/-) या प्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदरच्या खर्चाची तोंडमिळवणी करणे करिता लेखाशिर्षा मधील रकमेच्या तरतुदी मध्ये पुनर्वियोजित अंदाज पत्रकामध्ये दुरूस्ती करणेस देखील ही सभा अखेर मंजूरी देत आहे. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता दिपावली सणापूर्वी कर्मचा-यांना सदर रकमेचे वाटप करणे बाबत नियमानुसार कार्यवाही करणेस व येणा-या खर्चास ही सभा बहुमताने मान्यता देण्यात येत आहे.

सुचक : मा.श्री. किशोर डागवाले

अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर

सही /-

महापौर

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दिनांक : ३-११-२००७.

-----------------------------------------------------

प्रस्तावाचा विषय : विकास योजना ( वाढीव क्षेत्र ) अहमदनगर दिनांक १-१०-२००७ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकतींची सुनावणी घेण्यांसाठी नियोजन समितीस निर्देश देणेबाबत मा.नगरसेवक श्री.शेख अरिफ रफिउद्यीन ,मा.श्री.सतिष बबनराव मैड,मा.सौ.संध्या बाळासाहेब पवार यांची दिनांक १०-१०-२००७ तसेच श्री.सुभाष लोंढे सभापती स्थायी समिती यांची दि.२०-१०-२००७ रोजीची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर शहराच्या वाढीव क्षेत्रासाठी तयार केलेली विकास योजना नागरिकांच्या अवलोकनार्थ दिनांक २७/०७/२००६ रोजी मा.शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यांत आली. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील कलम २६ अन्वये विकास योजना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर ६० दिवसांच्या मुदतीत नागरिकांनी आपल्या हरकती व सुचना महानगरपालिकेस सादर करणे आवश्यक असते. त्यानंतर उक्त कलमांच्या कलम २८ (२) अन्वये या विहित मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती व सुचना ऐकुन घेण्यासाठी नियोजन समितीचे गठण करण्यांत येते. अशा रितीने आता नियोजन समिती पुर्ण क्षमतेने गठीत झालेली आहे.

या नियोजन समितीच्या दिनांक ०४/१०/२००७ रोजी झालेल्या पहिल्या बैठकीत प्राप्त हरकती सुचनांचा आढावा घेतला असता असे आढळून आले की, विहित मुदतीत २४८ हरकती प्राप्त झालेल्या आहेत. व त्यानंतरच्या दोन दिवसात ११३ हरकती प्राप्त झालेल्या आहेत. व त्यानंतर ०१/१०/२००७ पर्यंत २० हरकती प्राप्त झाल्या अशा सर्व एकुण ३८१ हरकती प्राप्त झाल्या आहेत. नियोजन समितीने या बाबत सखोल आढावा घेतला असता त्यांच्या असे निदर्शनास आले की, माहे जुलै व माहे ऑगस्ट या ३१ दिवसांच्या दोन महिन्यात हरकती दाखल करण्याची मुदत होती. ढोबळ मानाने हरकती सुचनांची विहित मुदत दोन महिने गृहीत धरुन अशा हरकती व सुचना नागरीकांनी दिलेल्या आहेत. मात्र ३१ दिवसांच्या

महिन्यामुळे विहित मुदत त्यांच्या अपेक्षेपेक्षा दोन दिवस अगोदर संपली. त्यामुळे शेवटच्या दोन दिवसात मोठ्या संख्येने हरकती प्राप्त झाल्या. त्यानंतरच्या काळातही दिनांक ०१/१०/२००७ पर्यंत एकुण २० हरकती प्राप्त झालेल्या आहेत. यातील बहुसंख्य शेतक-यांना कायद्याने ज्ञान नसल्यामुळे त्यांना हरकती व सुचना देण्यास उशीर झालेला असावा व त्यांना नैसर्गीक न्याय देणे आवश्यक आहे. असे समितीचे एकमत झाले. मात्र विहित मुदतीनंतर आलेल्या अर्जांची अशी सुनावणी घेण्यासाठी मा.महासभेचे स्पष्ट निर्देश आवश्यक आहेत. असे उपस्थित शासन नियुक्त नियोजन समिती सदस्यांनी सांगितले. मा.नगरसेवक श्री.शेख आरीफ रफियोद्दीन मा.श्री.सतिष बबनराव मैड व मा.सौ.संध्या बाळासाहेब पवार हे तीन सन्माननीय नगरसेवक उपरोक्त नमुद नियोजन समितीचे सदस्य आहेत. त्यांनी संदर्भीत यादी देवुन हा विषय मा.महासभेत घेणे बाबत विनंती मा.महापौर यांचेकडे केलेली आहे. या विनंतीशी नगररचना विभाग सहमत आहे. हा विषय मा.महासभेपुढे घेणे योग्य होईल असे मत आहे. तथापि याबाबत पुढील आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सामान्य) साो, यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित नियोजन समिती हरकती / सूचना बाबत निर्णयास्तव मा.महासभेकडे प्रस्ताव पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.महापौर साो, यांचा अभिप्राय की, " अ " प्रमाणे महासभेपुढे ठेवणे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सामान्य), मा.महापौर साो, यांच्या अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

-- * --

चर्चा :

१) मा.श्री.दीप चव्हाण - याबाबतचे शेवटपर्यंत चालू ठेवावे.

यानंतर सभापती, स्थायी समिती यांनी दिलेला विषय असल्याने ते स्वतः , मा.श्री.दीप चव्हाण, मा.श्री.अशोक कानडे भाषणासाठी उभे राहीले असता सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. त्यावर श्री.धोंगडे, नगररचनाकार यांनी खुलासा केला कि, हरकती घेण्याच्या दोन्ही महिन्यामध्ये ३१ दिवस आलेले असल्यामुळे परिस्थिती उदभवली आहे.

२) मा.श्री.अशोक कानडे - वर्तमानपत्रात प्रसिध्दी पुनश्च देउ शकतो काय.

३) मा.श्री.कैलास गिरवले - टीपी स्कीम नं.४ फा.प्लॉट नं.१०१ मधील ओस्तवाल यांचे ले आउट संदर्भात मा.श्री.घुले साहेब यांनी अनेकवेळा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळेस मनपा वकिलांचे कायदेशीर मत घेण्याबाबत महापौर यांनी आदेश दिले होते. त्यासंदर्भात वकीलांचे मत काय आले, याची विचारणा केली.

श्री.ओस्तवाल व इतर प्लॉट मालकांनी महाराष्ट्र शासनाचे नगरविकास खात्याकडे नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४७ अन्वये अपिल दाखल केले होते व सदरची सुनावणी होवुन नगर विकास खात्याने श्री.ओस्तवाल व इतर प्लॉटधारकाचे अपिल २४ ऑगस्ट २००२ ला मंजुर केलेले आहे. तसेच या विषयाबाबत महाराष्ट्र शासनाचे विरूध्द हायकोर्टात रीट दाखल करणे उचित होणार नाही. असे दि. ९-१०-२००७ रोजी महानगरपालिकेचे वकील सौ.नगरकर यांचे सुध्दा मत आलेले आहे. असे सभागृहात नगर रचनाकार व नगरसेवक यांचे चर्चेवरून मिळालेल्या माहितीवरून दिसुन येत आहे. तसेच श्री.धोंगडे यांनी देखील बरीचशी माहिती दिलेपासुन शंकरराव घुले यांचे समाधान झाल्याचे दिसते. आता पुन्हा हा विषय सभागृहात आणु नये.

यावर श्री.धोंगडे, नगररचनाकार यांनी खुलासा केला कि, याबाबत वकीलाचे मत असे आहे की, अपील आहे ते शासनाने मान्य केले आहे. त्यामुळे आपणास शासनाच्या विरुध्द न्यायालयात अपील करणे उचित होणार नाही, असे मत दिले आहे.

४) मा.श्री.शंकरराव घुले - शासनाचे निर्णयानुसार व वकीलाचे म्हणणेनुसार कार्यवाही करावी.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट व साधक बाधक झालेल्या चर्चेनुसार विकास योजना ( वाढीव क्षेत्र ) या विषया करीता हरकती व सुचना मागविणे कामी दिलेल्या मुदतीचा विचार करता या विषयाशी निगडीत असलेले कोणी नागरिक वंचित राहु नये अशा बाबत सभागृहाने व्यक्त केलेल्या भावनांचा विचार करता व झालेल्या चर्चेनुसार दिनांक ३०-११-२००७ रोजी पर्यंत हरकती व सुचना मागविणेस ही सभा मान्यता देत असुन सदरच्या कालावधीत प्राप्त होणा-या हरकती व सुचनांचे अर्जावर सुनावणी घेण्याबाबत नियोजन समितीस ही सभा निर्देश देत आहे.

याबाबत वृत्तपत्रामध्ये प्रेसनोट तसेच जाहिर निवेदन प्रसिध्द करणेस मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजुर.नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.किशोर डागवाले

अनुमोदक : मा.श्री.नामदेवराव पवार

ठराव सर्वानुमते मंजुर. सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दिनांक : ३-११-२००७.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर शहरात बसविण्यात येत असलेल्या हायमास्ट दिव्याकरीता वस्तुस्थितीचे अवलोकन व अंतिम निर्णयास्तव महासभेपुढे मंजुरीस्तव सादर.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर शहरात सुरुवातीला २ + ७ = ९ सेमी हायमास्ट पध्दतीचे दिवे बसविण्यांत आले होते. त्यानंतर मा.सदस्यांच्या प्रभागनिहाय निधीतून काही सदस्यांना त्यांच्या प्रभागा अंतर्गत असलेल्या चौकात सेमी हायमास्ट पध्दतीचे ४ किंवा ६ फिटींगजअसलेले दिवे बसविणेस मंजूरी देण्यात आलेली होती. तद्नंतर शहर विकास आराखडया नुसार शहरातील प्रमुख चौक असलेल्या २८ ठिकाणांना मान्यता देण्यांत आली. तसेच मा.आमदार महोदयांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गतही काही ठिकाणी सेमी हायमासट बसविणेंस मान्यता देण्यांत आली आहे.

असे असून सुध्दा या व्यतिरिक्त इतर मा.सदस्यांच्या सेमी हायमास्ट बसविण्यांबाबतच्या याद्या या विभागाकडे प्राप्त आहेत. तसेच मा.महापौर साहेब यांनी ही शहरातील अजुन काही चौकात सेमी हायमास्ट बसविणे बाबत सूचविलेले आहे. तसेच जिल्हा नियोजन शाखा यांचेकडुन मा.आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अंदाजपत्रके सादर करावयाची पत्रे ही इकडेस प्राप्त आहेत.

वरील सर्व बाबींचा विचार करता महानगरपालिके मार्फत सुरुवातीस बसविण्यांत आलेल्या सेमी हायमास्ट पध्दतीच्या दिव्यांचा उर्जेचा बचतीकरण करणेचा उद्देश सफल होणे बाबत साशंकता निर्माण होते त्यातच विद्युत विभागाकडे असणारा अपूरा तांत्रीक कर्मचारी वर्ग ही याबाबी पेलण्यास असमर्थ असल्याने भविष्यात याच्या देखभाल दुरुस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे.

सेमी हायमास्ट पध्दतीचे दिवे उभारणीचे अंदाजपत्रक बनविणे बाबत मा.सदस्यांचाही इकडेस सारखा तगादा चालू आहे. त्यामुळे आपणांस विनंती करण्यांत येते की, याबाबत निश्चीत धोरण होवून योग्य तो धोरणात्मक निर्णय होणे गरजेचे असल्याने कृपया मार्गदर्शन मिळावे.

यावर मा.उपायुक्त साो, यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित नुसार वस्तु स्थितीचे अवलोकन होवुन निर्णयास्तव महासभेकडे पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साो, यांचा अभिप्राय की, या अगोदरच हा विषय महासभेपुढे ठेवणे बाबत सुचित केलेले होते. तरी " A " नुसार कार्यवाही करावी.

यावर मा.महापौर साो, यांचा अभिप्राय की, सर्व साधारण सभेपुढे घेणे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त साो, मा.आयुक्त साो, मा.महापौर साो, यांच्या अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

-- * --

चर्चा :

१) मा.श्री.सतीश मैड - शहरात जे निरनिराळे हायमास्ट दिवे बसविण्यात आलेले आहेत त्यावर लावलेले नावाचे बोर्ड त्वरीत उतरविण्यात यावेत. महानगरपालिकेला जाहीरातीच्या माध्यमातून दोन पैसे मिळाले असते. तो महापालिकेचा तोटा झालेला आहे. यामुळे सर्वांचे नांवाचे बोर्ड त्वरीत काढण्यात यावेत.

२) मा.श्री.शंकरराव घुले - शहराच्या सुशोभिकरणाबाबत मी मा.आयुक्त यांचे अभिनंदन करतो. महापालिका फंडातून ही योजना राबविली जात होती. मोठमोठे दिवे बसविण्यात आले. या योजनेचा उददेश चांगला होता. परंतु नगर शहरामध्ये ही फार मोठी डोकेदुखी झाली. याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा. कारण हे सर्व योजना जनतेच्या पैशातून राबविली जात आहे. जनतेच्या पैशातून कामे केली जात असताना नांवे कशाला. याबाबत आमदार निधी वेगळा, महापौर निधी वेगळा त्यामुळे टिकेचा विषय झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये विजेचा तुटवडा असताना सुध्दाही दोन दोन हायमास्ट दिव्याची स्पर्धा सुरु झालेली आहे. याबाबत गंभीर विचार करणे आवश्यक आहे. सगळया हायमास्टवर लिहीलेली नांवे पूसून टाकण्यात यावी. नांवे लिहीण्याने व बोर्ड लावण्याने कोणी मोठे होत नाही. कामानेच माणूस मोठा होतो. त्यामुळे याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा.

काही नगरसेवकांच्या भागामध्ये अदयापही एकही हायमास्ट लागलेला नाही. त्याबाबतही विचार करावा. हायमास्टवर लागलेले महापौर, आमदार अशी नांवे दुरुस्त करावीत. हायमास्टबाबत आयुक्त यांचा अहवाल घ्यावा.

३) मा.श्री.अनंत जोशी - हायमास्टबाबत तांत्रिक बाबी तपासून न पहाता प्रसिध्दी प्रकार घडू लागले आहेत. सोडीअम व्हेपर ऐवजी १२-१२ हायमास्ट दिवे लावलेले आहेत. प्रशासनाने यास मंजूरी दिलेली आहे. प्रशासनाने चुका करावयाच्या आणि महासभेकडे जावयाचे हे बरोबर नाही. प्रशासनाने आम्हालाही हायमास्ट बसविणेबाबत यादया मागितलेल्या आहेत.

४) मा.श्री.संदीप कोतकर, महापौर - याबाबत स्थायी समितीने निर्णय घेतला नाही. याबाबतची संकल्पना चांगली होती.

५) मा.श्री.अनंत जोशी - प्रशासनाने केलेल्या चुकांमुळे पदाधिकारी चव्हाटयावर आले. आम्ही हायमास्टबाबत आग्रही नाही. आमच्या यादया बाजूला ठेवल्या. आम्ही ४ X ३६चे हायमास्टची मागणी केली होती व ज्याठिकाणी खरोखर सेव्हींग होत आहे त्याठिकाणी लावलेले नाहीत.

६) मा.श्री.अभय आगरकर - हायमास्ट दिवे लावल्यामुळे महापालिकेचे एनर्जीचे बील ६० हजार रुपयाने वाढलेले आहे. याबाबत खुलासा करावा. याबाबत श्री.निकम, मेकॅ.इंजि यांनी सांगितले की, या फिटींग्जमुळे एक लाखाचे बील वाढलेले आहे. हायमास्ट ज्याठिकाणी लावण्यात आले त्याठिकाणच्या फिटींग्ज इतरत्र नसलेल्या ठिकाणी लावण्यात आल्या.

७) मा.श्री.अनंत जोशी - १५० वॅट सोडीअम व्हेपर काढून इतर ठिकाणी कमी वॅटच्या फिटींग्ज का लावण्यात आल्या नाहीत. याबाबत योग्य निर्णय घ्यावा.

८) मा.श्री.अशोक कानडे - सर्व भागामध्ये हायमास्ट बसविण्यात आले. तथापी हददवाढ भागामध्ये स्ट्रीट लाईट फिटींग्ज अजून नाही. वाडयावस्त्यावर लाईट अजिबात नाही. याबाबत आम्ही पत्र देउन थकलो आहोत. हददवाढीच्या भागात स्ट्रीटलाईट फिटींग नसलेबाबत आयुक्त यांनी धोरण जाहीर करावे. ८६ लाख रुपयांचा हायमास्टवर खर्च झालेला आहे असे सांगितले जाते आणि स्ट्रीट लाईट लावणेसाठी पैसे नाहीत असे सांगितले जाते. ही विसंगती का? यावर मा.महापौर यांनी खुलासा केला कि, नागापूर, बोल्हेगांव येथे ५०० स्ट्रीट लाईट बसविणेची मागणी आहे. याबाबत फ्रेश बजेटमध्ये सदरचा विषय घेउन मंजूर करणार आहोत असे सांगितले.

पुढे श्री.अशोक कानडे यांनी विचारणा केली. आता प्रस्तावीत हायमास्ट लावणेकरिता किती खर्च होणार आहे, याचा खुलासा करावा. ४५ लाखामध्ये स्ट्रीट लाईटसाठी काही तरतुद करावी.

९) मा.श्री.नामदेव पवार, विरोधी पक्ष नेता - ज्या ठिकाणी आवश्यक आहेत त्यानुसार तांत्रिक मंजुरी घेउन गरज पाहून त्या ठिकाणीच हायमास्ट लावावेत. वार्षिक टेंडर काढावे. त्यावरील कोणतेही नांवे काढून टाकावीत.

१०) मा.श्री.बहिरनाथ वाकळे - काही हायमास्ट खाजगी जागेत लावण्यात आले आहेत का, ते पहावे. त्याबाबत श्री.सावळे यांनी खुलासा करावा. यावर श्री.सावळे, इले.सुप. यांनी खुलासा केला कि, मा.श्री.मनेष साठे, नगरसेवक यांनी यादी दिली होती.

११) मा.श्री.भानुदास कोतकर - विकास योजनेतील कामगारांचे काम संपण्यात आले असल्याने त्यांना फुकटचा पगार मिळत आहे. विकास योजनेतील घटक कर्मचारी इकडे वर्ग करण्याबाबत तपासून कार्यवाही करावी. त्यावर मा.आयुक्त यांनी सांगितले की, डीपी युनिटबाबत नगररचनाकार यांचा अहवाल घेउन कार्यवाही करण्यात येईल.

१२) मा.श्री.विनीत पाउलबुधे - सर्वच कर्मचा-यांची ओळख परेड घ्यावी.

१३) मा.श्री.भगवान फुलसौंदर - सोडीअम व्हेपर एनर्जी सेव्हींग फिटींग लावण्यात आलेले आहेत. संपूर्ण शहराचा सर्व्हे करण्यात आला होता. टायमर बसविण्यात आले होते. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, बीओटी बेसवर करण्याबाबत ठरले होते. मा.महापौर यांनी ज्या नगरसेवकांच्या भागात बसविण्यात आले नाहीत त्या भागात हायमास्ट बसविण्यात येतील, असे सांगितले.

१४) मा.श्री.शंकरराव घुले - प्रत्येक नगरसेवकाचे भागात १-१ हायमास्ट दयावा व त्यावरील नांवे पुसून टाकावीत.

१५) मा.श्री.भानुदास कोतकर - ज्या नगरसेवकांना हायमास्ट मिळाले नाहीत, त्याठिकाणी अधिका-यांना पाठवून तपासणी करुन हायमास्ट आवश्यक तेवढेच बसवावेत.

१६) मा.श्री.भगवान फुलसौंदर - याबाबत योजना आखावी. पुणे-औरंगाबाद प्रमाणे एनर्जी सेव्हींग फिटींग लावावे. तसेच सोडीयम लावावे. रस्त्याच्या कडेला लाईट बसवावेत. संपूर्ण शहराचा सर्व्हे करुन एनर्जी सेव्हींगसाठी टाईमर बसवावेत. वींडपावर बाबतही कार्यवाही करावी.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला कि, एनर्जी सेव्हींग फिटींगबाबत आलेल्या टेंडरमध्ये विविधता आहे. आपल्याकडे एक्सपर्ट अधिकारी नसल्याने "मेडा" कडे पाठविले होते. परंतु कालच त्यांनी पत्र देवून कर्मचारी नसल्याने तपासता येत नाही, असे पत्र देवून पाकीट न फोडता परत पाठविले आहे. त्यामुळे निर्णयात अडचणी येत आहेत.

१७) मा.श्री.अशोक कानडे - किमान एक हायमास्ट हददवाढीत आम्हाला दयावा.

१८) मा.श्री.संदीप कोतकर, महापौर - यापुढे हायमास्टवरील नांवाचे बोर्ड काढून टाकण्यात यावे.

१९) मा.श्री.अभय आगरकर - जवळजवळ ४२ वस्त्या अंधारात आहेत. काही ठिकाणी उजेड व काही ठिकाणी अंधार हे योग्य नाही. यासाठी महिना रु.२ लाख ८० हजार खर्च झालेला आहे. शहरात हायमास्ट लावण्याचे फॅड कमी करण्यात यावे. पुढील वर्षी जकात चालु रहाणार नाही, याचे भान ठेवावे. प्रत्येक हायमास्ट फिटींगमध्ये ६५ हजार रुपये घेतलेले आहेत. एका-एका पोलवर ८ ते १२ फिटींग आहेत. हा सर्व खर्च मनपाला परवडणारा आहे काय. नागरिकांच्या करामधून मिळालेला पैसा चांगल्या रितीने वापरला पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. सदर लावलेले हायमास्ट रात्री १२ पर्यंत चालु ठेवले पाहिजेत. सिध्दार्थनगर येथे समोरासमोर लावलेल्या हायमास्टपैकी एक काढून घेतला पाहिजे.

याबाबत स्ट्रीट लाईट एनर्जी रिपोर्ट तयार करावा व महापालिकेला किती खर्च वाढला आहे. या वाढणा-या खर्चाबाबत महापालिकेने पालकत्वाची भूमिका घ्यावी. याठिकाणी कोणाची प्रतिष्ठा महत्वाची नाही. सामंजस्य पाहिजे.

२०) मा.श्री.भानुदास कोतकर - सिध्दार्थनगर येथील हायमास्ट प्लॅनप्रमाणे लावलेले नाहीत. येथून पुढे प्लॅनींगप्रमाणे बसविणेबाबत धोरण राबविण्यात यावे. दुसरा हायमास्ट कशाप्रकारे बसविण्यात आला, ते पहावे.

२१) मा.श्री.दीप चव्हाण - सिध्दार्थनगर हायमास्ट बसविणेबाबत दि.१८-१२-२००६ ची वर्कऑर्डर दिलेली होती तसेच याबाबत मा.आयुक्त यांचेशी चर्चा केली होती.

२२) मा.श्री.शंकरराव घुले - यामध्ये राजकारण झालेले आहे. त्याबाबत योग्य निर्णय घेण्यात यावा.

-- * --

ठराव : अहमदनगर शहरात लावण्यात आलेल्या व सध्या लावण्यात येत असलेल्या हायमास्ट दिवे बाबत सांगोपांग चर्चेअंती असे ठरविण्यात येते की,

१. यापुर्वी बसविलेल्या सर्व हायमास्ट दिव्यांवरील नांवाचे बोर्ड तातडीने काढुन घेण्यात यावेत. यात मा.महापौर ,मा.आमदार व मा.नगरसेवक यांचे बोर्ड असुन प्रशासनाने ते त्वरीत काढुन घेणे.

२.ज्या नगरसेवकांना अद्यापि एकही हायमास्ट दिवा मंजुर झालेला नाही अशा नगरसेवकांना किमान एक हायमास्ट दिवा मंजुर करण्यात येत असुन हायमास्टचा कलर (सिल्व्हर) एकसारखा असावा. मनपाच्या अमरधाम या वास्तुमध्ये दोन हायमास्ट बसविणे बाबत कार्यवाही करावी मात्र यापुढे या व्यतिरिक्त नविन हायमास्ट दिव्यांना मंजुरी देवु नये. मा.खासदार,मा.आमदार यांचे स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत हायमास्ट दिव्यांनाही मंजुरी अगर ना-हरकत प्रमाणपत्र देवु नये. शेवटी विद्युत भार हा महानगरपालिकेस भरावा लागतो.

खर्च मंजुर.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री.नामदेव पवार

अनुमोदक : मा.श्री.बहिरनाथ वाकळे

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## खास सभा दि.३-११-०७

विषय क्र.१ - जलतरण तलावामध्ये मुलाचा झालेला मृत्यु.

१) मा.श्री.दीप चव्हाण - अहवाल वाचन करण्यात यावे. त्यानुसार अहवाल वाचन करण्यात आले.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - जलविहार संदर्भामध्ये रिपोर्ट वाचल्याप्रमाणे दोन वर्षामध्ये तीन मुलांचा दुर्दैवी मृत्यु झालेला आहे. तथापी त्यामुळे सदरचा जलतरण तलाव बंद ठेवणे हा त्यास पर्याय नाही. जलतरण तलावाच्या ठेकेदार एजन्सीने लाखो रुपये खर्च केलेले आहेत. त्यामुळे तसेच जलतरण तलाव होण्यासाठी बरेच नागरिकांनी मासिक, वार्षीक पैसे भरुन पोहण्याचे पास काढलेले आहेत. त्यांचे हित लक्षात घेता जलतरण तलाव चालु करण्यात यावा अशी भूमिका आहे. या सध्याच्या परिस्थितीमध्ये मार्ग काढून योग्य ती कार्यवाही चालू ठेवून तलाव मनपामार्फत चालू व्हावा, या तलावाचे पाणी सोडण्यात आलेले आहे. आता पुन्हा पाणी भरण्यास वेळ लागणार आहे. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. सध्या पोहण्याचा सिझन नाही. परंतु ज्यांनी मासिक, वार्षिक तिकीटे काढलेली आहेत त्यांचेसाठी मार्ग काढून तलाव चालू करावा व तसेच पाणी भरण्यास सुरुवात करावी.

३) मा.श्री.दिप चव्हाण - तलावामध्ये आतापर्यंत क्षिरसागर, भळगट इ. युवकांचा मृत्यु झालेला आहे. जलतरण तलावाच्या करारनाम्यात त्रुटी आहेत. १-१ लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. करारनाम्यातील त्रुटी आताच पाहण्यात आल्या. तत्पुर्वी करारनाम्यामध्ये त्रुटी नव्हत्या काय? पहिला, दुसरा व तिसरा अपघात झाल्यानंतर त्रुटी लक्षात आल्या काय. त्यावेळी जबाबदारी का पाहिली नाही.

आता अपघात झालेल्या युवकांनी तिकीट काढले होते काय. त्या तिकीटाचा नंबर काय होता व मुलाचे वय काय होते.

जलविहारबाबत पर्याय काढणे आवश्यक आहे. तलाव बंद ठेवणे योग्य नाही. सध्या तलाव बंद ठेवलेला आहे काय. तो चालु केव्हा करणार. याबाबत उपाय काय आहेत. अशा त-हेच्या घटना घडू नये याबाबत चर्चा करण्यात यावी.

याबाबत मेकॅ.इंजि.श्री.निकम यांनी खुलासा केला.

४) मा.श्री.कैलास गिरवले - यापूर्वी दोन दुर्दैवी घटना घडल्या व आताची घटना धरुन तीन दुर्दैवी अंत झाले आहेत. याला जबाबदार तलावाचे ठेकेदार माजी सैनिक संघाची संस्था आहे. त्यांना जबाबदार धरुन त्यांचेवर कारवाई करण्यात यावी. तथापी तलाव बंद करण्याचा विचार न केलेला बरा. जे लोक मासिक, वार्षिक पास काढून पोहण्यास येतात व जेष्ठ नागरीक आहेत त्यांचेसाठी तलाव चालु ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधीत ठेकेदारावर कारवाई जरुर करावी परंतु तलाव बंद करण्यात येउ नये. पूर्वी नगरपरिषदेचे कर्मचारी तलावावर काम करीत होते. त्या कर्मचा-यांना घेउन तलाव चालू करता येउ शकतो. फक्त पास धारकासाठी तलाव चालू करावा.

५) मा.श्री.भगवान फुलसौंदर - यावर उहापोह केलेला आहे. जलतरण तलावाची सुविधा चांगली आहे. झालेल्या घटना दुर्देवी आहेत. मृतांच्या नातेवाईकांना एक-एक लाखाची मदत देण्यात आलेली आहे. मदत करणे हे ठेकेदाराचे कर्तव्य होते. येथून पुढे घटना घडणार नाहीत, याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. तलाव बंद ठेवणे योग्य आहे काय. तर किती दिवस बंद ठेवणार. सर्व मुलभूत सोयींबरोबर पोहण्याची सेवा दिली गेली पाहिजे. याबाबत कायदेशीर कारवाई जरुर करा. तसेच कायदेशीर मत घेउन तलाव चालु करावा.

६) मा.श्री.अशोक कानडे - क्षिरसागर, भळगट, पठाण यांचा दुर्दैवी मृत्यु झाला. क्षिरसागर या युवकाचा मृत्यु झालेला होता. त्यावेळेस भावना तिव्र होत्या. भळगट, पठाण यांचेबाबत संस्था कशी जबाबदार आहे, याबाबत चर्चा झालेली आहे.

ख-या अर्थाने निर्णय घेणे आवश्यक आहे. नियमानुसार कार्यपध्दती निश्चित करावी. भविष्यात घटना घडून येणार नाहीत. याबाबत समन्वयाचा अभाव दिसून येत आहे. संस्थेवर कारवाई करावयाची आहे. नवीन अटी व नियम करताना इतर महानगरपालिकेचे जलतरण तलाव कशा प्रकारे चालविले जातात याचा याबाबत सांगोपांग विचार करुन मनपा तलावावर नियंत्रण करणेसाठी सक्षम यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

अहमदनगर शहरात एकच जलतरण तलाव आहे. या तलावाचा सर्वांनाच फायदा होतो. तलाव बंद ठेवून फायदा नाही. तलाव चालु राहीला पाहिजे व तातडीने चालु करावा. यापुर्वी तीन घटना घडल्याचा अहवाल स्पष्ट आहे. क्षिरसागर यांच्या घटनेनंतर कोणतेही निर्देश दिलेले नाहीत. त्यावर विचार करणे आवश्यक आहे.

कार्यपध्दतीबाबत नियमावली करण्याची गरज आहे. भळगट व क्षिरसागर यांचा ज्या वेळी अपघात घडला त्याच वेळेस संस्थेने इन्शुरन्स केले असते तर त्याबाबतची माहिती मला उपलब्ध करुन देणे.

तलावाबाबत समितीने त्रुटी अहवाल दिलेला आहे. युवकाच्या मृत्युनंतर डेथ सर्टिफिकेट पाहून त्याची कारणे नमूद करणे व त्यावरुन भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, अशा उपाययोजना कराव्यात. चांगल्या पध्दतीची यंत्रणा कार्यान्वीत करावी. नियमावली तयार करुन जलतरण तलाव चालु करावा.

७) मा.श्री.अनंत जोशी - जलतरण तलावाचा विषय गंभीर स्वरुपाचा आहे. जलतरण तलाव हा अहमदनगर शहरातील ऐतिहासिक तलाव आहे. याची निर्मिती ४० वर्षापूर्वी झालेली आहे. घटना घडली त्याबाबत तांत्रिक दोष आहे काय याची तपासणी केली पाहिजे. मृतांच्या नातेवाईकांना मदत दिली जाणार आहे हे चांगले आहे. ऑफिस रिपोर्टामध्ये " तलावाचा ठेका मा.महासभेच्या मंजुरीने रदद करुन पुन्हा जाहीर निविदा देवून दुस-या एजन्सीला ठेका देणे अथवा तरण तलावाचा लिलाव करुन त्याचे खाजगीकरण करणे योग्य राहील असे मत आहे." त्याबाबत मनपा सक्षम असेल तर नियमावली काटेकोर करावी व महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भुर्दंड होणार नाही, हे पहावे.

यावर मा.उपमहापौर श्री.सुळ यांनी खुलासा केला.

८) मा.श्री.नरेंद्र कुलकर्णी - तलावाबाबत अतिरिक्त गोष्टी तपासून पहाव्यात. तसेच तलावात जाळी बसविणेबाबत कार्यवाही करावी म्हणजे अशा घटना घडणार नाहीत.

९) मा.श्री.अभय आगरकर - अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. जलतरण तलाव चालु राहो न राहो परंतु महानगरपालिकेच्या तलावामध्ये जलतरण सुविधा नागरीकांना देणे कायदयाने बंधनकारक आहे. तलाव बंद करणे हा पर्याय होउ शकत नाही. कायदेशीर बाबी पाहिल्यातर अडथळा निर्माण होणार आहे. यामध्ये मध्यम मार्ग म्हणजे समोरच्या संस्थेला बोलावून घेवून त्यांनी केलेला खर्चाबाबत कॉम्प्रोमाईज करुन खर्च भरुन देउ शकतो. किंवा त्यानंतर ठेका रदद करु शकतो.

जलतरण तलाव चालु राहीला पाहिजे. इतर खाजगी तलाव महाराष्ट्रामध्ये वेगवेगळया ठिकाणी चालु आहेत. त्याचा अभ्यास करावा व याबाबत चांगली डीड करु शकतो. महापालिका कर्मचा-यांवर तलाव चालविण्यास सक्षम आहे काय. पूर्वी तलावात पोहणा-या नागरिकांची संख्या कमी होती. आता खूपच वाढलेली आहे. याबाबत चांगल्या अटी शर्ती सुचवाव्यात व मध्यम भूमिका घेउन हा प्रश्न सोडवावा.

१०) मा.श्री.शंकरराव घुले - तीन वर्षामध्ये तीन अपघात झालेले आहेत. ठेकेदाराविषयी विचार करणे आवश्यक आहे. मा.श्री.कृ.द.जाधव यांनी सांगितल्याप्रमाणे सदर बाबत कराराचा भंग ठेकेदाराने केलेला आहे. ठेका रदद करण्यास अडचण येणार नाही. संस्थेला शासन जरुर करावे तसेच याबाबत नाशिक, मुंबई, पुणे येथील पध्दती पाहून त्याचा अभ्यास करावा व सध्याचा ठेका रदद करावा. मी नगराध्यक्ष असताना अशा घटना घडलेल्या आहेत. महापालिकेने महिना दोन महिने तलाव चालवुन पहावा. तांत्रिक गोष्टी तपासून पहाव्यात. लोकांना कमी पैशात सुविधा उपलब्ध करुन देउ शकतो काय हे पहावे. ठेकेदाराने कराराचा भंग केल्यानंतर पर्यायी व्यवस्था करुन देणे हे मनपाचे कर्तव्य आहे. यावर अधिकारी, इंजिनिअरची देखरेख ठेवावी.

११) मा.श्री.आसाराम कावरे - तलावामध्ये ज्या दुर्दैवी घटना घडल्या त्यास माजी सैनिक संघ जबाबदार आहे. मनपाचा काही संबंध नाही. मनपाने तलाव चालवावा. माजी सैनिकांनी भरपाई दिली पाहिजे. प्रत्येक मृताच्या नातेवाईकास एक-एक लाख रुपये दयावेत.

१२) मा.श्री.दिपक सुळ, उपमहापौर - अहवाल पाहिला असता ठेका रदद करणे अशा बाबतचा प्रस्ताव आहे. ठेका रदद करणेबाबत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यामुळे ठेका रदद करु शकत नाही.

१३) मा.श्री.शंकरराव घुले - आपण ठेका रदद करु शकतो.

१४) मा.श्री.कैलास गिरवले - अहवालावरुन ठेका रदद करु शकतो.

१५) मा.श्री.नामदेव पवार, विरोधी पक्ष नेता - अहवाल स्पष्ट झालेला आहे.

१६) मा.श्री.सतिष मैड - सदस्यांच्या भावना लक्षात घेउन ठेका रदद करावा.

त्यानंतर सभागृहात गोंधळ झाला. त्यानंतर मा.महापौर यांनी खुलासा केला.

१७) मा.श्री.दिपक सुळ, उपमहापौर - माजी सैनिक संघाने तलावाकरिता खर्च करुन चांगल्या सुविधा दिलेल्या आहेत. मात्र आता मनपाने तलाव चालवावयाचा असल्यास स्त्री रक्षक गार्ड नाहीत तसेच जीवरक्षक कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत.

१८) मा.श्री.भानुदास कोतकर - मनपाने तलाव चालु करणेबाबत कमिटी करुन निर्णय घ्यावा. कायदेशीर अहवाल वाचून दाखवावा. यावर श्री.निकम, मेकॅ.इंजि. यांनी अटीशर्ती वाचून दाखविल्या.

१९) मा.श्री.शंकरराव घुले - अहवालामध्ये स्पष्ट म्हंटलेले आहे. सर्व अटीशर्तीचा भंग झालेला आहे. एजन्सी रदद करावी पर्याय शोधावा.

२०) मा.श्री.नामदेव पवार, विरोधी पक्षनेता - इतर मनपातील माहिती घेण्यासाठी कमिटी नेमावी. तलावामध्ये मृत्यु घडतात ते घडू नये याकरिता उपाययोजना करावी व ठेका रदद करणेबाबत सुचविले.

२१) मा.श्रीमती.वर्षा आरिफ - नवीन ठेकेदाराची गॅरंटी काय आहे.

२२) मा.श्री.सतिश मैड - अपघात सारखे होत नाहीत. ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे झालेले आहेत. मृत्यु रोखणे आपल्या हातात आहे. हा हलगर्जीपणाचा विषय आहे. अपघाताचा नाही. संस्थेला किती वेळा पाठीशी घालावे याचाही विचार करावा. करारनामा रदद करावा अशी विनंती आहे. व चांगले जलतरणपटू पाहून त्यांना नेमावे.

२३) मा.आयुक्त - कस्टोडीयन म्हणून सर्व जबाबदारी आहे. इतर शाब्दीक तारतम्य बाळगले पाहिजे. ठेकेदाराने दर वाढविणेबाबत पत्र दिले होते. खर्चाचाही विचार केला गेला पाहिजे. तलाव बंद केल्यामुळे कायदेशीर त्रास होणार नाही. ही एक संस्था आहे. मनपा तलाव चालवू शकते काय चांगल्या सुविधा आहेत. ठेका रदद करावा काय याकरिता वर्तमानपत्रामध्ये जाहीर करावे लागेल. मा.महापौर यांनी खुलासा केला की, तलाव चालविण्याकरिता कोणीही निविदा भरलेल्या नव्हत्या. ही संस्था स्वत:हून पुढे आलेली आहे.

२४) मा.श्री.नामदेव पवार, विरोधी पक्षनेता - पहिला मृत्यु झाला त्यावेळेस काय उपाययोजना केली.

२५) मा.श्री.कृ.द.जाधव - मा.आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे तलाव चालु होणे अत्यंत गरजेचे आहे.

२६) मा.श्री.अभय आगरकर - लिगल ओपिनियन घ्यावे.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, सर्व पक्षीय कमीटी नेमून निर्णय घेवू.

विषय क्र.२ - मनपा कर्मचा-यांना वैदयकीय खर्चाची प्रतिपुर्ती.

ऑफिस रिपोर्ट वाचण्यात आला.

१) मा.श्री.अनंत जोशी - सदर विषय मंजूर करण्यास हरकत नाही. मात्र अपघातीबाबत विमा उतरविण्यात आला आहे काय. याबाबत सहा.आयुक्त यांनी खुलासा केला.

२) मा.श्री.अशोक कानडे - हा विषय यापूर्वीच घ्यावयास पाहिजे होता व तशी कर्मचा-याची गरज होती. विम्याबाबतचा विषय आणि हा विषय यामध्ये जम्बलींग होत आहे. सध्या आलेला विषय हा कर्मचा-यांना वैदयकीय खर्चाची प्रतिपुर्ती याबाबत आहे. याबाबत मा.आयुक्त यांनी खुलासा करावा. तसेच याबाबत मानधनावरील कर्मचा-यांना ही योजना लागू आहे काय अशी विचारणा केली असता सहा.आयुक्त यांनी खुलासा केला की, ही योजना मानधनावरील कर्मचा-यांना लागू होणार नाही. त्यावर मा.श्री.कानडे यांनी वैदयकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मान्यताप्राप्त हॉस्पीटलची यादी निश्चित केली आहे काय. मान्यताप्राप्त हॉस्पीटलची यादी निश्चित करावी. यास मा.श्री.अनंत जोशी यांनी अनुमोदन दिले.

३) मा.श्री.शंकरराव घुले - सदरचा एक चांगला प्रस्ताव सभेपुढे मांडला. याबददल मी प्रशासनाचे अभिनंदन करतो. संघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी ही एक चांगली योजना आहे. विषय मंजूर करण्यास विनंती आहे.

४) मा.श्री.आसाराम कावरे - सदरचा विषय मंजूर करण्यास हरकत नाही.

५) मा.श्री.दीप चव्हाण - ही योजना कर्मचा-यांना कधीपासून व कशाप्रकारे लागु होणार आहे. या योजनेकरिता हॉस्पीटलची यादी पत्र देउन निश्चित करावी. तसेच पेन्शनर लोकांना आर्थिकदृष्टया योजना लागु करावी. याच्यात काही आजार नमूद केलेले आहेत. इतर आजारांचे काय? कर्मचा-यांना ५१/७९ अॅवार्डच्या तरतुदी लागु आहेत. वारसा हक्क नोकरीबाबत १६५ कर्मचा-यांना घेतलेले नाही. याबाबत शासनाचा अभिप्राय मागवून कारवाई करणार आहेत काय?

शासकीय वैदयकीय प्रतिपूर्ती योजना लागू करणेबाबत मुख्य लेखाधिकारी श्री.कर्डीले यांनी खुलासा केला.

६) मा.श्री.भाउसाहेब उडाणशिवे - कागद, काच, पत्रा या असंघटीत कामगारांच्या आरोग्य विषयक कार्यवाहीबाबतचा प्रश्न उपस्थित केला.

विषय क्र.३ - सानुग्रह अनुदान.

१) मा.श्री.अनंत जोशी - मंजूर करण्यास हरकत नाही.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - मंजूर करण्यास हरकत नाही.

३) मा.श्री.आसाराम कावरे - सानुग्रह अनुदानाचा विषय सभागृहापुढे मांडल्याबददल आभार मानतो. महानगरपालिकेला जकातीपासून मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळत आहे. दिवाळी, दसरा, रमजानईद, गोकुळआष्टमी इ. सणाच्या निमित्ताने अनुदान देण्यात येणार आहे. याबाबत मी मा.आयुक्त यांना बहुजन समाज पक्षाच्या वतीने विनंती करीत आहे. महापालिकेकडे पैसे शिल्लक असतानासुध्दाही कर्मचा-यांना दिले जात नाही. कर्मचा-यांची दिवाळी यावर्षी चांगली साजरी होण्याच्या दृष्टीने सुखसमृध्दी मिळण्याचे दृष्टीने सर्व नगरसेवकांना विनंती करतो, दिवाळीपुर्वी कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान म्हणून रु.१०,०००/- देणे आवश्यक आहे.

४) मा.श्री.संदीप कोतकर, महापौर - सानुग्रह अनुदानाबाबतचा खुलासा प्रशासनाने करावा असे सांगतले असता त्यावर सहा.आयुक्त यांनी खुलासा केला.

५) मा.श्री.शंकरराव घुले - या विषयाबाबत कामगार युनियनशी चर्चा प्रशासनाने केली आहे. मी नगराध्यक्ष असताना नगरपरिषदेच्या कर्मचा-यांना त्यावेळी ५६ दिवसाचा पगार बोनस म्हणून वाटलेला आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहीली असता उत्पन्न चालु आर्थिक वर्षात ब-यापैकी आहे. चालु आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये याबाबत बजेट तरतुद किती केली आहे. व एकूण खर्चासाठी किती तरतुद करावी लागेल या सर्वाचा विचार करुन व महानगरपालिकेच्या तिजोरीचा विचार करुन समन्वय साधून मंजूर करण्यास हरकत नाही. मात्र मा.आयुक्त यांनी आपण किती सानुग्रह अनुदान देउ शकतो व आर्थिक ताकद किती आहे, हे सांगितले पाहिजे. आर्थिक धोरण सभागृहात ठेवले तर आम्ही निर्णय घेउ शकतो, याबाबतचा खुलासा करावा असे सुचविले.

६) मा.श्री.अनंत जोशी - सन १९९९ नंतर कामगार कर्मचा-यांना बोनस मिळालेला नाही. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली असेल तर कर्मचारी त्यापासून वंचित राहू नयेत. याकरिता चालु आर्थिक वर्षामध्ये इतर बजेट हेडवर खर्च न झालेले पैसे वर्ग करुन कर्मचा-यांना अनुदान दयावे. आम्ही भारतीय जनता पक्षाच्या वतीने रु.६०००/- प्रत्येकी अनुदान दयावे असे सुचवित आहोत. सर्व कर्मचा-यांना दिवाळीच्या शुभेच्छा.

७) मा.श्री.कृ.द.जाधव - पूर्वी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती आताच्या इतकी चांगली नव्हती. त्यावेळी सुध्दा आम्ही नगरपालिकेच्या रिझर्व फंडातून पैसे काढून कर्मचा-यांना बोनस दिलेला आहे. आता योगायोगाने महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. त्यामुळे योग्य निर्णय घ्यावा. वाटल्यास कर्मचा-यांकडून अंडरटेकींग घ्यावे व जे काही होईल त्यास वसुलपात्र असेल त्यामध्ये भिती बाळगण्याचे काही कारण नाही. त्यामुळे मा.श्री.आसाराम कावरे यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यास मी पाठींबा देउन तो प्रस्ताव मंजूर करावा अशी विनंती करतो.

८) मा.श्री.कैलास गिरवले - महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती कशी आहे. काही महानगरपालिकांनी गेल्या वर्षी जे सानुग्रह अनुदान दिलेले होते त्याची आकडेवारी ऑफिस रिपोर्टामध्ये आहे. मिरा-भाईंदर रू. ४८०० भिवंडी रू. ४२०० नाशिक रू. ५००० औरंगाबाद रू. २००० यांनी एवढे अनुदान दिलेले आहे. आपणही याबाबत कार्यवाही करावी तसेच प्रोबेशन वरील कर्मचा-यांचाही विचार करावा.

९) मा.श्री.दीप चव्हाण - श्री.गिरवले यांचे तत्व बरोबर आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीबाबत ऑफिस रिपोर्टामध्ये महापालिकेस किती देणे आहे, किती शिल्लक आहे हे विषयात यावयास पाहिजे होते. म्हणजे आर्थिक परिस्थितीचा आढावा घेताना हे समजले असते हव किती सानुग्रह अनुदान देता येईल याबाबत अर्थविभागाने खुलासा करावा व कर्मचा-यांना प्रत्येकी रु.१०००० सानुग्रह अनुदान दयावे.

यावर मुख्य लेखाधिकारी श्री.कर्डीले यांनी आर्थिक परिस्थितीबाबतचा खुलासा केला.

१०) मा.श्री.अभय आगरकर - महानगरपालिका कर्मचा-यांना किती सानुग्रह अनुदान देउ शकते.

११) मा.श्री.भगवान फुलसौंदर - सानुग्रह अनुदान देण्याचा विषय अभ्यासपूर्ण आहे काय. विषय अर्धवट आहे असे सांगितले. यावर मा.महापौर यांनी महानगरपालिका सभेपुढे विषय मांडताना प्रस्ताव अर्धवट येउ नये असे सांगितले.

१२) मा.श्री.सतिश मैड - रु.६०००/- सानुग्रह अनुदान आपण देउ शकतो काय. जास्तीत जास्त रक्कम देण्यात यावी.

१३) मा.श्री.अनंत जोशी - आर्थिक परिस्थितीनुसार मान्य करावा असे सांगितले.

१४) मा.श्री.संदीप कोतकर, महापौर - प्रशासनाने आपली भूमिका मांडावी, अशी विनंती केली.

१५) मा.आयुक्त - अंदाजपत्रकामध्ये सानुग्रह अनुदान देणेबाबत टोकन तरतुद करण्यात आलेली आहे व आर्थिक परिस्थिती पाहून तरतुद केलेली आहे. महापालिकेला जकातीचे उत्पन्न मिळत आहे. तरी सुध्दा इतर हेडवरील तरतुदी जवळजवळ संपलेल्या आहेत. कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत सहानुभूतीपूर्वक निर्णय घेत असताना कोणी रु.६०००

दयावेत तर कोणी रु.१०००० दयावेत असे सुचविले आहे. तथापी एकत्रीत निर्णय होणे आवश्यक आहे.

१५) मा.श्री.अभय आगरकर - योग्य परिस्थितीपाहून निर्णय घ्यावा.

(सर्व पक्षीय नगरसेवकांच्या एकमताने निर्णय घेण्याबाबत सुचविण्यात आले व त्यांच्या चर्चेनुसार सभागृहात निर्णय जाहीर करण्यात येईल, असे सांगण्यात आले. ) त्यानंतर मा.महापौर यांनी सर्वानुमते रु.२०००/- प्रत्येक कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्याची शिफारस करीत आहे, असे सांगितले.

विषय क्र.४ - विकास योजना (वाढीव क्षेत्र).

१) मा.श्री.दीप चव्हाण - याबाबतचे शेवटपर्यंत चालू ठेवावे.

यानंतर सभापती, स्थायी समिती यांनी दिलेला विषय असल्याने ते स्वतः , मा.श्री.दीप चव्हाण, मा.श्री.अशोक कानडे भाषणासाठी उभे राहीले असता सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. त्यावर श्री.धोंगडे, नगररचनाकार यांनी खुलासा केला कि, हरकती घेण्याच्या दोन्ही महिन्यामध्ये ३१ दिवस आलेले असल्यामुळे परिस्थिती उदभवली आहे.

२) मा.श्री.अशोक कानडे - वर्तमानपत्रात प्रसिध्दी पुनश्च देउ शकतो काय.

३) मा.श्री.कैलास गिरवले - टीपी स्कीम नं.४ फा.प्लॉट नं.१०१ मधील ओस्तवाल यांचे ले आउट संदर्भात मा.श्री.घुले साहेब यांनी अनेकवेळा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळेस मनपा वकिलांचे कायदेशीर मत घेण्याबाबत महापौर यांनी आदेश दिले होते. त्यासंदर्भात वकीलांचे मत काय आले, याची विचारणा केली.

यावर श्री.धोंगडे, नगररचनाकार यांनी खुलासा केला कि, याबाबत वकीलाचे मत असे आहे की, अपील आहे ते शासनाने मान्य केले आहे. त्यामुळे आपणास शासनाच्या विरुध्द न्यायालयात अपील करणे उचित होणार नाही, असे मत दिले आहे.

४) मा.श्री.शंकरराव घुले - शासनाचे निर्णयानुसार व वकीलाचे म्हणणेनुसार कार्यवाही करावी.

विषय क्र.५ - हायमास्ट दिवे.

१) मा.श्री.सतीश मैड - शहरात जे निरनिराळे हायमास्ट दिवे बसविण्यात आलेले आहेत त्यावर लावलेले नावाचे बोर्ड त्वरीत उतरविण्यात यावेत. महानगरपालिकेला जाहीरातीच्या माध्यमातून दोन पैसे मिळाले असते. तो महापालिकेचा तोटा झालेला आहे. यामुळे सर्वांचे नांवाचे बोर्ड त्वरीत काढण्यात यावेत.

२) मा.श्री.शंकरराव घुले - शहराच्या सुशोभिकरणाबाबत मी मा.आयुक्त यांचे अभिनंदन करतो. महापालिका फंडातून ही योजना राबविली जात होती. मोठमोठे दिवे बसविण्यात आले. या योजनेचा उददेश चांगला होता. परंतु नगर शहरामध्ये ही फार मोठी डोकेदुखी झाली. याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा. कारण हे सर्व योजना जनतेच्या पैशातून राबविली जात आहे. जनतेच्या पैशातून कामे केली जात असताना नांवे कशाला. याबाबत आमदार निधी वेगळा, महापौर निधी वेगळा त्यामुळे टिकेचा विषय झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये विजेचा तुटवडा असताना सुध्दाही दोन दोन हायमास्ट दिव्याची स्पर्धा सुरु

झालेली आहे. याबाबत गंभीर विचार करणे आवश्यक आहे. सगळया हायमास्टवर लिहीलेली नांवे पूसून टाकण्यात यावी. नांवे लिहीण्याने व बोर्ड लावण्याने कोणी मोठे होत नाही. कामानेच माणूस मोठा होतो. त्यामुळे याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा.

काही नगरसेवकांच्या भागामध्ये अदयापही एकही हायमास्ट लागलेला नाही. त्याबाबतही विचार करावा. हायमास्टवर लागलेले महापौर, आमदार अशी नांवे दुरुस्त करावीत. हायमास्टबाबत आयुक्त यांचा अहवाल घ्यावा.

३) मा.श्री.अनंत जोशी - हायमास्टबाबत तांत्रिक बाबी तपासून न पहाता प्रसिध्दी प्रकार घडू लागले आहेत. सोडीअम व्हेपर ऐवजी १२-१२ हायमास्ट दिवे लावलेले आहेत. प्रशासनाने यास मंजूरी दिलेली आहे. प्रशासनाने चुका करावयाच्या आणि महासभेकडे जावयाचे हे बरोबर नाही. प्रशासनाने आम्हालाही हायमास्ट बसविणेबाबत यादया मागितलेल्या आहेत.

४) मा.श्री.संदीप कोतकर, महापौर - याबाबत स्थायी समितीने निर्णय घेतला नाही. याबाबतची संकल्पना चांगली होती.

५) मा.श्री.अनंत जोशी - प्रशासनाने केलेल्या चुकांमुळे पदाधिकारी चव्हाटयावर आले. आम्ही हायमास्टबाबत आग्रही नाही. आमच्या यादया बाजूला ठेवल्या. आम्ही ४ X ३६चे हायमास्टची मागणी केली होती व ज्याठिकाणी खरोखर सेव्हींग होत आहे त्याठिकाणी लावलेले नाहीत.

६) मा.श्री.अभय आगरकर - हायमास्ट दिवे लावल्यामुळे महापालिकेचे एनर्जीचे बील ६० हजार रुपयाने वाढलेले आहे. याबाबत खुलासा करावा. याबाबत श्री.निकम, मेकॅ.इंजि यांनी सांगितले की, या फिटींग्जमुळे एक लाखाचे बील वाढलेले आहे. हायमास्ट ज्याठिकाणी लावण्यात आले त्याठिकाणच्या फिटींग्ज इतरत्र नसलेल्या ठिकाणी लावण्यात आल्या.

७) मा.श्री.अनंत जोशी - १५० वॅट सोडीअम व्हेपर काढून इतर ठिकाणी कमी वॅटच्या फिटींग्ज का लावण्यात आल्या नाहीत. याबाबत योग्य निर्णय घ्यावा.

८) मा.श्री.अशोक कानडे - सर्व भागामध्ये हायमास्ट बसविण्यात आले. तथापी हददवाढ भागामध्ये स्ट्रीट लाईट फिटींग्ज अजून नाही. वाडयावस्त्यावर लाईट अजिबात नाही. याबाबत आम्ही पत्र देउन थकलो आहोत. हददवाढीच्या भागात स्ट्रीटलाईट फिटींग नसलेबाबत आयुक्त यांनी धोरण जाहीर करावे. ८६ लाख रुपयांचा हायमास्टवर खर्च झालेला आहे असे सांगितले जाते आणि स्ट्रीट लाईट लावणेसाठी पैसे नाहीत असे सांगितले जाते. ही विसंगती का? यावर मा.महापौर यांनी खुलासा केला कि, नागापूर, बोल्हेगांव येथे ५०० स्ट्रीट लाईट बसविणेची मागणी आहे. याबाबत फ्रेश बजेटमध्ये सदरचा विषय घेउन मंजूर करणार आहोत असे सांगितले.

पुढे श्री.अशोक कानडे यांनी विचारणा केली. आता प्रस्तावीत हायमास्ट लावणेकरिता किती खर्च होणार आहे, याचा खुलासा करावा. ४५ लाखामध्ये स्ट्रीट लाईटसाठी काही तरतुद करावी.

९) मा.श्री.नामदेव पवार, विरोधी पक्ष नेता - ज्या ठिकाणी आवश्यक आहेत त्यानुसार तांत्रिक मंजुरी घेउन गरज पाहून त्या ठिकाणीच हायमास्ट लावावेत. वार्षिक टेंडर काढावे. त्यावरील कोणतेही नांवे काढून टाकावीत.

१०) मा.श्री.बहिरनाथ वाकळे - काही हायमास्ट खाजगी जागेत लावण्यात आले आहेत का, ते पहावे. त्याबाबत श्री.सावळे यांनी खुलासा करावा. यावर श्री.सावळे, इले.सुप. यांनी खुलासा केला कि, मा.श्री.मनेष साठे, नगरसेवक यांनी यादी दिली होती.

११) मा.श्री.भानुदास कोतकर - विकास योजनेतील कामगारांचे काम संपण्यात आले असल्याने त्यांना फुकटचा पगार मिळत आहे. विकास योजनेतील घटक कर्मचारी इकडे वर्ग करण्याबाबत तपासून कार्यवाही करावी. त्यावर मा.आयुक्त यांनी सांगितले की, डीपी युनिटबाबत नगररचनाकार यांचा अहवाल घेउन कार्यवाही करण्यात येईल.

१२) मा.श्री.विनीत पाउलबुधे - सर्वच कर्मचा-यांची ओळख परेड घ्यावी.

१३) मा.श्री.भगवान फुलसौंदर - सोडीअम व्हेपर एनर्जी सेव्हींग फिटींग लावण्यात आलेले आहेत. संपूर्ण शहराचा सर्व्हे करण्यात आला होता. टायमर बसविण्यात आले होते. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, बीओटी बेसवर करण्याबाबत ठरले होते. मा.महापौर यांनी ज्या नगरसेवकांच्या भागात बसविण्यात आले नाहीत त्या भागात हायमास्ट बसविण्यात येतील, असे सांगितले.

१४) मा.श्री.शंकरराव घुले - प्रत्येक नगरसेवकाचे भागात १-१ हायमास्ट दयावा व त्यावरील नांवे पुसून टाकावीत.

१५) मा.श्री.भानुदास कोतकर - ज्या नगरसेवकांना हायमास्ट मिळाले नाहीत, त्याठिकाणी अधिका-यांना पाठवून तपासणी करुन हायमास्ट आवश्यक तेवढेच बसवावेत.

१६) मा.श्री.भगवान फुलसौंदर - याबाबत योजना आखावी. पुणे-औरंगाबाद प्रमाणे एनर्जी सेव्हींग फिटींग लावावे. तसेच सोडीयम लावावे. रस्त्याच्या कडेला लाईट बसवावेत. संपूर्ण शहराचा सर्व्हे करुन एनर्जी सेव्हींगसाठी टाईमर बसवावेत. वींडपावर बाबतही कार्यवाही करावी.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला कि, एनर्जी सेव्हींग फिटींगबाबत आलेल्या टेंडरमध्ये विविधता आहे. आपल्याकडे एक्सपर्ट अधिकारी नसल्याने "मेडा" कडे पाठविले होते. परंतु कालच त्यांनी पत्र देवून कर्मचारी नसल्याने तपासता येत नाही, असे पत्र देवून पाकीट न फोडता परत पाठविले आहे. त्यामुळे निर्णयात अडचणी येत आहेत.

१७) मा.श्री.अशोक कानडे - किमान एक हायमास्ट हददवाढीत आम्हाला दयावा.

१८) मा.श्री.संदीप कोतकर, महापौर - यापुढे हायमास्टवरील नांवाचे बोर्ड काढून टाकण्यात यावे.

१९) मा.श्री.अभय आगरकर - जवळजवळ ४२ वस्त्या अंधारात आहेत. काही ठिकाणी उजेड व काही ठिकाणी अंधार हे योग्य नाही. यासाठी महिना रु.२ लाख ८० हजार खर्च झालेला आहे. शहरात हायमास्ट लावण्याचे फॅड कमी करण्यात यावे. पुढील वर्षी जकात चालु रहाणार नाही, याचे भान ठेवावे. प्रत्येक हायमास्ट फिटींगमध्ये ६५ हजार रुपये घेतलेले आहेत. एका-एका पोलवर ८ ते १२ फिटींग आहेत. हा सर्व खर्च मनपाला परवडणारा आहे काय. नागरिकांच्या करामधून मिळालेला पैसा चांगल्या रितीने वापरला पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. सदर लावलेले हायमास्ट रात्री १२ पर्यंत चालु ठेवले पाहिजेत. सिध्दार्थनगर येथे समोरासमोर लावलेल्या हायमास्टपैकी एक काढून घेतला पाहिजे.

याबाबत स्ट्रीट लाईट एनर्जी रिपोर्ट तयार करावा व महापालिकेला किती खर्च वाढला आहे. या वाढणा-या खर्चाबाबत महापालिकेने पालकत्वाची भूमिका घ्यावी. याठिकाणी कोणाची प्रतिष्ठा महत्वाची नाही. सामंजस्य पाहिजे.

२०) मा.श्री.भानुदास कोतकर - सिध्दार्थनगर येथील हायमास्ट प्लॅनप्रमाणे लावलेले नाहीत. येथून पुढे प्लॅनींगप्रमाणे बसविणेबाबत धोरण राबविण्यात यावे. दुसरा हायमास्ट कशाप्रकारे बसविण्यात आला, ते पहावे.

२१) मा.श्री.दीप चव्हाण - सिध्दार्थनगर हायमास्ट बसविणेबाबत दि.१८-१२-२००६ ची वर्कऑर्डर दिलेली होती तसेच याबाबत मा.आयुक्त यांचेशी चर्चा केली होती.

२२) मा.श्री.शंकरराव घुले - यामध्ये राजकारण झालेले आहे. त्याबाबत योग्य निर्णय घेण्यात यावा.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

दिनांक २६-११-२००७ रोजी घेण्यांत येणां-या स्थायी समिती सदस्य नियुक्तीबाबत कार्यक्रम पत्रिका.

सन २००७ च्या महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग अध्यादेश क्र.२, दिनांक २७ फेब्रुवारी २००७ चे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारीत कलम ३१ अ अन्वये नविन ८ स्थायी समिती सदस्य यांची प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देउन नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणे.

| अ.नं. | तपशिल / विवरण | वेळ |
|---|---|---|
| १ | खास सभा सुरु होण्याची वेळ | दिनांक २६-११-२००७ सकाळी ११.०० वाजता . |
| २ | पक्षीय गट प्रमुखांनी मा.स्थायी समितीवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करावयाच्या सदस्याचे पत्र दाखल करणे. | दिनांक २६-११-२००७ सकाळी ११.००ते ११.३० वाजेपर्यंत . |
| ३ | मा.सदस्यांची नियुक्ती जाहिर करणे | दिनांक २६-११-२००७ दुपारी २.०० वाजलेनंतर |

१.मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर यांचेकडेस नियुक्त करावयाच्या सदस्यांचे पत्र मा.महासभेत विहीत मुदतीत दाखल करणे आवश्यक राहील.

२.आपल्या पक्षांच्या संख्या बळानुसारच दर्शविलेल्या संख्ये इतकीच मा.स्थायी समिती सदस्यांची नांवे नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती अपेक्षीत आहे.त्यापेक्षा अधिक नावे प्राप्त झाल्यास अनुक्रमांकानुसार पक्षनिहाय परिस्थिती पाहून महासभेत निर्णय घेतला जाईल

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.